सत्यमेव जयते

Government of Maharashtra

**DIRECTORATE OF EDUCATION**

(Secondary and Higher Secondary)
Maharashtra State, Pune

# Std. 11th
# Centralised Online Admission Process
## (For Maharashtra State)

# माहितीपुस्तिका
# INFORMATION BOOKLET
# 2025-26

**वेब पोर्टल**

**https://mahafyjcadmissions.in**

**Helpline - 8530955564**

**support@mahafyjcadmissions.in**

## इयत्ता ११वी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया (महाराष्ट्र राज्य)

## माहितीपुस्तिका २०२५-२६

| | | |
|---|---|---|
| ✼ प्रवर्तक | : | शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन |
| ✼ प्रकाशक © | : | शिक्षण संचालनालय (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे |
| ✼ संपादक | : | **डॉ. महेश पालकर,**<br>शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे |
| ✼ कार्यकारी संपादक | : | **डॉ. श्रीराम पानझाडे,**<br>सहसंचालक, शिक्षण संचालनालय (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे |
| ✼ सहसंपादक | : | **डॉ. वंदना वाहूळ,**<br>उपसंचालक, शिक्षण संचालनालय (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे |
| ✼ संपादन सहाय्य | : | **श्री. अनंत दाणी,** प्रशासन अधिकारी,<br>शिक्षण संचालनालय (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे<br>**श्री. विकास गरड,** ज्येष्ठ अधिव्याख्याता, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, पुणे<br>**श्री. अशोक पानसरे,** विस्तार अधिकारी,<br>राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे |
| ✼ आवृत्ती | : | दिनांक २५ मे २०२५ |
| ✼ टीप | : | प्रवेश पोर्टलवर पीडीएफ स्वरूपात प्रकाशित. |

डीटीपी आणि आतील सजावट : समृद्धी-९७३०१०६७५५



सत्यमेव जयते

**मंत्री**
**शालेय शिक्षण,**
महाराष्ट्र राज्य

प्रिय विद्यार्थी मित्रांनो, सस्नेह नमस्कार!

इयत्ता दहावीपर्यंत आपण मिळविलेल्या यशाबद्दल आपले मन:पूर्वक अभिनंदन!

इ.१०वी झाली, आता पुढे काय? असा प्रश्न तुम्हाला नक्कीच पडला असेल. पण मित्रांनो, गोंधळून जाऊ नका. इयत्ता-११वी, १२वी म्हणजे उच्च माध्यमिक स्तराचे शिक्षण ही महाविद्यालयीन उच्च शिक्षणाची पूर्वतयारी असते. या स्तरावरील शैक्षणिक व स्पर्धात्मक बदलांना आपण पूर्ण क्षमतेने सामोरे जायला हवे.

आपल्या भविष्याचा मार्ग ठरविण्यासाठी आपल्या शाळेतील समुपदेशक यांच्याशी सल्लामसलत करा. आपल्या पालकांशी चर्चा करा, आपली आवड-निवड, प्राप्त गुण, यांची नोंद घ्या आणि पुढील शिक्षणासाठी कोणती शाखा निवडावी हे ठरवा. आपल्या अंगीकृत कौशल्यांना योग्य प्रकारच्या शिक्षणाची जोड द्या व आपला भविष्यकाळ उज्ज्वल करा.

इयत्ता ११वी कला, वाणिज्य, विज्ञान या शाखांचे प्रवेश केंद्रीय ऑनलाईन पद्धतीने होत आहेत. ही प्रवेश प्रक्रिया अधिकाधिक विद्यार्थीकेंद्री होण्यासाठी आवश्यक कार्यपद्धती शासनाने निश्चित केलेली आहे.

सदर प्रवेश प्रक्रिया खऱ्या अर्थाने ऑनलाईन होत आहे. त्यामध्ये माहितीपुस्तिका मिळविणे, शुल्क जमा करणे, अर्ज भरणे व प्रवेश निश्चित करणे या सर्व प्रक्रिया केवळ ऑनलाईन पद्धतीने करावयाच्या आहेत. त्यामुळे सर्वांना सुरक्षित राहून गर्दी न करता सर्व कार्यवाही करणे सुलभ होईल.

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री माननीय ना. देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री माननीय ना. एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री माननीय ना. अजित पवार यांची प्रेरणा आपल्या सर्वांच्या पाठीशी आहे. संपूर्ण प्रवेश प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने राबवून आपणास गुणवत्तेनुसारच प्रवेश दिला जाईल याची खात्री बाळगा.

आपल्या पुढील शैक्षणिक वाटचालीस मन:पूर्वक शुभेच्छा!

आपला

दादाजी

**(दादाजी भुसे)**

**राज्यमंत्री**
**गृह (ग्रामीण), गृहनिर्माण**
**शालेय शिक्षण, सहकार, खनिकर्म**
महाराष्ट्र राज्य

प्रिय विद्यार्थी मित्रांनो!

दहावीच्या परीक्षेत मिळविलेल्या घवघवीत यशाबद्दल आपले मनःपूर्वक अभिनंदन!

दहावीनंतर यशाची क्षितिजे खुणावत असतात त्याचप्रमाणे कनिष्ठ महाविद्यालयात कसा आणि कुठे प्रवेश घ्यावा याबाबत थोडा संभ्रम असतो. मात्र शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये संपूर्ण महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांकरिता केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

भविष्यातील तुमच्या स्वप्नांच्या पूर्ततेकरिता आज तुमचा कल, आवड ओळखून अचूक क्षेत्र निवडा. ही ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया अधिकाधिक तंत्रस्नेही व विद्यार्थी केंद्री केलेली आहे.

महाराष्ट्रातील तमाम विद्यार्थ्यांनो आत्मविश्वासाने उचित क्षेत्र निवडून यशाची शिखरे गाठा.

मनःपूर्वक शुभेच्छा!

आपला

**(डॉ. पंकज भोयर)**

डीटीप आणि आतील सजावट : समृद्धी-९७३०१०६७५५

सत्यमेव जयते

**प्रधान सचिव**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
मंत्रालय, मुंबई – ३२

प्रिय विद्यार्थी मित्रहो सस्नेह नमस्कार!

जीवनातील एक महत्त्वाचा टप्पा अर्थात दहावीची परीक्षा कठोर मेहनतीच्या जोरावर आपण चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झालात त्या यशाबद्दल हार्दिक अभिनंदन!

नवा आत्मविश्वास, नवी महत्त्वाकांक्षा, नवे क्षितिज उरामध्ये जपून प्रगतीच्या दिशेने गरुडझेप घेणाऱ्या विद्यार्थ्यांना आपली आवड, कल व क्षमता ओळखून आवडणाऱ्या क्षेत्रात प्रगती करण्यासाठी महाराष्ट्र राज्यामधील आपल्या सोयीच्या जिल्ह्यामध्ये तसेच आवडत्या कनिष्ठ महाविद्यालयामध्ये प्रवेश घेण्यासाठी शासनाने नवीन शैक्षणिक धोरणानुसार संधी उपलब्ध करून दिली आहे.

सुकर जीवनमानाकरिता (Ease Of Living) संपूर्ण महाराष्ट्रामध्ये एकाच वेबसाईटवर केंद्रीय पद्धतीने ऑनलाईन पारदर्शकपणे प्रवेश होणार आहेत. तंत्रस्नेही विद्यार्थ्यांनो, ऑनलाईन शिक्षण प्रक्रियेत सहभागी होऊन विद्यार्थीकेंद्री प्रवेश पद्धती यशस्वी करा.

गरुडभरारी घेऊन यशस्वी व्हा.

पुढील वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा!

आपला

**(रणजित सिंग देओल)**

डीटीप आणि आतील सजावट : समृद्धी-९७३०९०६७५५

सत्यमेव जयते

**आयुक्त (शिक्षण)**
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रिय विद्यार्थी,

इयत्ता दहावीपर्यंत आपण मिळविलेल्या यशाबद्दल आपले मन:पूर्वक अभिनंदन!

आपल्या आयुष्यातील शैक्षणिक क्षेत्रातील शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण करणे हा एक महत्त्वाचा टप्पा आहे. तो आपण यशस्वीरीत्या पूर्ण केला आहे. आपल्याकरिता आता विविध पर्याय पुढील शिक्षणाकरिता उपलब्ध आहेत. कुटुंबातील वडिलधारी मंडळी आपणाशी विविध क्षेत्रांबाबत/शाखांबाबत विचारविनिमय करीत असतात. अशा टप्प्यावर शालांत परीक्षेनंतर इयत्ता ११वीच्या प्रवेशाकरिता आपण शाखानिवडीबाबत तयारी करीत आहोत.

इयत्ता ११ वीच्या प्रवेशाकरिता आपल्यासाठी विविध शैक्षणिक शाखा खुल्या आहेत. प्रामुख्याने कला, वाणिज्य व विज्ञान इत्यादी शाखांचा त्यामध्ये समावेश आहे. या पर्यायांपैकी सुयोग्य शाखेची, सुयोग्य उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाची निवड आपण पालकांच्या/मित्रांच्या मदतीने करणार आहोत. यामध्ये उच्चतम दर्जाचे कनिष्ठ महाविद्यालयात आपल्या गुणवत्तेनुसार आपणास प्रवेश मिळावा याकरिता राज्य शासन कटिबद्ध आहे.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ वर्षापासून राज्यातील सर्व उच्च माध्यमिक विद्यालयातील इ.११वीचे प्रवेश हे ऑनलाइन व गुणवत्तेच्या आधारे करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. आपणास प्रवेशाबाबत काही संभ्रम असल्यास आपल्या शाळेतील शिक्षक किंवा शासनाने निश्चित केलेले मार्गदर्शक केंद्र तसेच कॉल सेंटर यांच्याशी सल्ला-मसलत करण्याची सुविधा उपलब्ध करण्यात आलेली आहे. याचा आपणास निश्चित उपयोग होईल, अशी अशा आहे.

उच्च माध्यमिक प्रवेशाकरिता, पुढील अभ्यासाकरिता व उज्ज्वल भविष्याकरिता सदिच्छा देतो!

आपला

३०/४/२५

**(सचिन्द्र प्रताप सिंह)**

डीटीपी आणि आतील सजावट : समृद्धी-९७३०९०६७५५

## प्रास्ताविक

महाराष्ट्र शासन

नमस्कार!

इ. ११वी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेची ही माहितीपुस्तिका आपल्या हाती सोपविताना मला आनंद होत आहे.

२०२५-२०२६ या शैक्षणिक वर्षापासून संपूर्ण राज्यात ऑनलाईन पद्धतीने इयत्ता ११वी प्रवेश प्रक्रिया राबविण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

विद्यार्थ्यांना अर्ज भरणे व प्रवेशाबाबत इतर माहिती जाणून घेण्यासाठी वारंवार उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये अथवा स्वीकृती केंद्रावर जावे लागत होते. त्याऐवजी त्यांना आता आपला प्रवेश अर्ज ऑनलाईन पद्धतीने सादर करता येईल. त्यामुळे इयत्ता ११वीमध्ये प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे श्रम, पैसा व वेळ वाचणार आहे. प्रवेश प्रक्रिया सुलभ व सुकर होण्याच्या दृष्टिकोनातून राज्यस्तर ते जिल्हास्तरापर्यंत समित्या गठित करण्यात आलेल्या आहेत.

या प्रवेश प्रक्रियेद्वारे कला, वाणिज्य व विज्ञान शाखांचे प्रवेश केंद्रीय ऑनलाईन पद्धतीने केले जातील. HSVC अर्थात व्यावसायिक शाखेचे प्रवेश आता उच्च माध्यमिक विद्यालय स्तरावरून होतील.

पालकांनी आपल्या पाल्यास त्याच्या भविष्याचा मार्ग / Career निवडण्यास मदत करावी व वेब पोर्टलवर अथवा संक्षिप्त संदेशाद्वारे (SMS) वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सूचनांचे नियमित अवलोकन करावे. या प्रवेश प्रक्रियेतील प्रत्येक घटकास सुलभ होईल अशी कार्यपद्धती अवलंबिण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.

राज्यातील इ. ११वी प्रवेशासाठी https://mahafyjcadmissions.in हे वेब पोर्टल देण्यात आलेले आहे. याच्या माध्यमातून महाराष्ट्रातील कोणत्याही उच्च माध्यमिक विद्यालयात प्रवेशासाठी अर्ज करणे, गुणवत्ता यादी तपासणे, प्रवेश मिळविणे इत्यादी बाबी एकाच ठिकाणाहून विद्यार्थ्यांना करता येणार आहेत.

विद्यार्थ्यांना व पालकांना मदत करण्यासाठी त्या त्या परिसरात मार्गदर्शन केंद्रे (Guidance Centres) स्थापन करण्यात आलेली आहेत. तसेच मोफत हेल्पलाईन सुरू आहे. ही पुस्तिका इंग्रजी व मराठी अशा दोन्ही माध्यमांतून उपलब्ध करून देण्यात येत आहे.

ही संपूर्ण प्रवेश प्रक्रिया विद्यार्थी, पालक व शाळा-महाविद्यालय यांच्यासाठी सुलभ ठरेल व विद्यार्थ्यांचा प्रवेशाचा मार्ग सुकर करेल अशी आशा आहे. धन्यवाद!

(डॉ. महेश पालकर)
शिक्षण संचालक
(माध्यमिक व उच्च माध्यमिक)
महाराष्ट्र राज्य, पुणे

डीटीपी आणि आतील सजावट : समृद्धी-९७३०९०६७५५

## ठळक बाबी

१) मोबाईलवर वापरण्यायोग्य वेब पोर्टल उपलब्ध आहे.

२) विद्यार्थ्यास लॉगीन आयडी व पासवर्ड नोंदणी वेळी ऑनलाईन मिळणार आहे.

३) विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज कोठूनही भरता येणार आहे.

४) कागदपत्रे अपलोड करून अर्ज ऑनलाईनच प्रमाणित होणार आहे.

५) प्रवेश प्रक्रिया नोंदणी शुल्क ऑनलाईन भरता येणार आहे.

६) शाळा, मार्गदर्शन केंद्र, विद्यार्थी, कनिष्ठ महाविद्यालय यांना फोनवरून संपर्क साधता येणार आहे.

७) अडचणीच्या निराकरणासाठी कॉल सेंटर/हेल्प लाईन व ऑनलाईन शंका-समाधान सुविधा आहे.

८) महत्त्वपूर्ण बाबींच्या कार्यवाहीची सूचना एसएमएसद्वारे मिळणार आहेत.

९) प्रत्येक फेरीचे कटऑफ गुण ऑनलाईन पाहता येणार.

१०) माहितीपुस्तिका वेब पोर्टलवर ऑनलाईनच उपलब्ध आहे.

## Key Features

1) Mobile Compatible portal is made available.

2) Students shall get Login ID and password immediately at the time of online registration.

3) Students will be able to fill online application form from any where.

4) Get your form verified online only by uploading your essential documents.

5) No cash, digital payment facility is made available.

6) School, Guidance Centre, Students Jr. Colleges can communicate each other over telephone.

7) Helpline/call centre and grievance redressal systems are made available for real time support.

8) Important activity will be communicated by SMS.

9) Cut-off marks of each round will be available on the portal.

10) Information Booklet is available at your finger tip on the portal.




डीटीपी आणि आतील सजावट : समृद्धी-९७३०९०६७५५

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | तपशील | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| 1. | या पुस्तिकेत वापरलेल्या संज्ञा | 12 |
| 2. | केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया समजावून घेऊ<br>(व्याप्ती, केंद्रीय प्रवेशाच्या फेऱ्या, राखीव कोटांतर्गत प्रवेश, आरक्षण) | 18 |
| 3. | विद्यार्थी नोंदणी व ऑनलाईन प्रवेश अर्ज भरणे<br>(प्रवेश अर्ज भाग-१, भाग-२ पसंतीक्रम, प्रवेश प्रक्रियेचा प्रवाह तक्ता) | 34 |
| 4. | विद्यार्थ्यांनी घ्यावयाच्या दक्षता<br>(विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन सूचना, नियमित फेऱ्यांचे नियम, अर्ज मागे घेणे) | 42 |
| 5. | प्रवेश फेरीची यादी जाहीर झाल्यावर<br>(पंसतीचे विद्यालय मिळाल्यास, न मिळाल्यास, प्रवेश कसा घ्यावा) | 48 |
| 6. | ११वी प्रवेशासाठी पात्रता आणि आवश्यक कागदपत्रे<br>(पात्रता, प्रवेश प्रक्रियेचे टप्पे, आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी कागदपत्रे) | 56 |
| 7. | अन्य मंडळांच्या विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक सूचना<br>(CBSE, CISCE, CAIE, IB, NIOS, etc.) | 62 |
| 8. | इतर महत्त्वाचे घटक<br>अ) पालकांसाठी मार्गदर्शन सूचना.<br>ब) प्रवेश देणाऱ्या उच्च माध्यमिक विद्यालयांनी करावयाची कार्यवाही.<br>क) मार्गदर्शन केंद्रांची/माध्यमिक शाळांची भूमिका. | 64 |


डीटीप आणि आतील सजावट : समृद्धी-९७३०१०६७५

# CONTENTS


| Sr.No. | Particulars | Page No. |
|---|---|---|
| 1. | **Terms used in this Booklet** | 13 |
| 2. | **The Centralised online admission process**<br>(Scope, CAP Rounds, Quota Admissions, Reservation) | 19 |
| 3. | **Student Registration and Online Application Form**<br>(Form Part-1, Part-2, Preferences, Process Flow Chart) | 35 |
| 4. | **Precautions to be taken by Students**<br>(Guidelines for Students, Round Discipline, Withdrawal of application) | 43 |
| 5. | **After Declaration of Round Allotment List**<br>(What if allotted/Not allotted, How to take admission) | 49 |
| 6. | **Essential Qualification and Required Documents**<br>(Eligibility for 11th Admission, Stages of Admission Process, required documents to avail Reservation Benefits) | 57 |
| 7. | **Guideline For other Board's Students**<br>(CBSE, CISCE, CAIE, IB, NIOS etc.) | 63 |
| 8. | **Other Allied Aspects**<br>A) Guidelines For Parents.<br>B) For Junior Colleges (The admitting authority).<br>C) Role of Guidance Centres / Secondary Schools. | 65 |


डीटीप आणि आतील सजावट : समृद्धी-९७३०९०६७५५

# 1 या पुस्तिकेत वापरलेल्या संज्ञा

(१.१) 'शासन' म्हणजे महाराष्ट्र शासन.

(१.२) विभाग म्हणजे महाराष्ट्र शासनाचा शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.

(१.३) माध्यमिक शाळा म्हणजे ज्या शाळेत इयत्ता १० वी च्या वर्षाअखेरीस माध्यमिक शालांत प्रमाणपत्र किंवा शासनाने समकक्ष मानलेल्या अन्य परीक्षेस बसण्याकरिता सर्वसाधारण शिक्षणाच्या अभ्यासक्रमाची सोय केली जाते.

(१.४) उच्च माध्यमिक विद्यालय म्हणजे जेथे इयत्ता ११ वी व १२ वीच्या शिक्षणाची व परीक्षा देण्याची सोय केली जाते. यामध्ये माध्यमिक संलग्न उच्च माध्यमिक शाळा, स्वतंत्र उच्च माध्यमिक विद्यालय आणि वरिष्ठ महाविद्यालय संलग्न कनिष्ठ महाविद्यालय यांचा समावेश होतो.

(१.५) अनुदानित उच्च माध्यमिक विद्यालय म्हणजे शासनाने विहित केलेल्या अनुदान सूत्रानुसार शासनाकडून कोणत्याही प्रकारचे अनुदान मिळत असलेली उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय.

(१.६) विना अनुदानित उच्च माध्यमिक विद्यालय म्हणजे शासनाकडून वेतन व वेतनेतर बाबींसाठी कोणतेही अनुदान मिळत नसलेली उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय. यामध्ये कायम शब्द वगळलेल्या कायम विनाअनुदानित उच्च माध्यमिक शाळांचा समावेश होतो.

(१.७) स्वयंअर्थसहाय्यित उच्च माध्यमिक विद्यालय याचा अर्थ महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत परवानगी देण्यात आलेली व होणारा कोणत्याही प्रकारचा सर्व खर्च व्यवस्थापन स्वत:च्या उत्पन्नातून करीत असलेली तसेच शासनाकडून कोणतेही अनुदान मिळत नसलेली उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय असा आहे. (इंग्रजी माध्यमाच्या कायम विनाअनुदानित शाळांचा यामध्ये समावेश होतो.)

(१.८) अल्पसंख्याक संस्था म्हणजे महाराष्ट्र शासनाने/केंद्र शासनाद्वारे धार्मिक अथवा भाषिक अल्पसंख्याक म्हणून घोषित केलेली संस्था.

(१.९) व्यवस्थापन कोटा म्हणजे ज्या व्यवस्थापनामार्फत उच्च माध्यमिक विद्यालय चालविण्यात येत आहे, त्या व्यवस्थापनाच्या स्तरावरून भरण्यासाठी राखीव ठेवलेल्या जागा.

(१.१०) अल्पसंख्याक कोटा म्हणजे ज्या अल्पसंख्याक (धार्मिक/भाषिक) संस्थेमार्फत उच्च माध्यमिक विद्यालय चालविण्यात येत आहेत त्या विद्यालयात अल्पसंख्याक प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी राखीव ठेवलेल्या जागा.

(१.११) इन-हाऊस कोटा (संस्थांतर्गत) म्हणजे उच्च माध्यमिक विद्यालयात, ज्या संस्थेमार्फत असे उच्च माध्यमिक विद्यालय चालवले जात असेल, त्या संस्थेमार्फत उच्च माध्यमिक शाळा असलेल्या परिसरात/आवारात चालविल्या जात असलेल्या माध्यमिक शाळेतून १०वी किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी राखून ठेवण्यात येणाऱ्या जागा.

डीजीप आणि आतील सजावट : समृद्धी-९७३०१०६०५५

# 1 Terms used in this Booklet

1.1 **Government** means Government of Maharashtra.

1.2 **Department** means the School Education Department of the Government of Maharashtra Mantralaya, Mumbai 32.

1.3 **Secondary School** means a school which provides a course in general education leading to std 10th i.e. the Secondary School Certificate Examination (SSC) or equivalent.

1.4 **Junior College** means a higher secondary school which provides education of std 11th and 12th leading to Higher Secondary Certificate Examination (HSC). It includes secondary attached Higher Secondary School. Independant Higher Secondary School and Junior college attached to Senior college.

1.5 **Aided Junior College** means a junior college receiving any type of grant-in-aid from the Government.

1.6 **Unaided Junior College** means a junior college not receiving any grant from the Government. It includes Permanent word removed Non English Medium Permanent Unaided Higher Secondary Schools.

1.7 **Self Financed Junior College** means the Higher Secondary School recognised under Maharashtra Self Financed School (Establishment and regulation) Act. 2012. Not entitled to get any type of grant from the Government. It also includes English Medium Permanent Unaided Higher Secondary Schools.

1.8 **Minority Institution** means an institution declared as a religious or a linguistic minority by the Government.

1.9 **Management Quota** means the reserved seats in the junior colleges, for management level admissions.

1.10 **Minority Quota** means the reserved seats for minority (Liguistic and Religious) category students in the minority institution run Junior colleges.

1.11 **In House Quota** means the seats reserved in a Junior College, for those students who have passed Std 10th from secondary schools run by the same Guardian Educational Institute functioning in the same premises.

डीटीप आणि आतील सजावट : समृद्धी-९७३०९०६७५५

१.१२)  **ऑनलाईन प्रवेश क्षेत्र** याचा अर्थ ज्या क्षेत्रामध्ये इ. ११वीचे प्रवेश केंद्रीय ऑनलाईन पद्धतीने करण्याचे निश्चित केलेले आहे असे क्षेत्र. यामध्ये राज्यमंडळ संलग्नित सर्व उच्च माध्यमिक/कनिष्ठ महाविद्यालये यांचा समावेश होतो.

(१.१३) **राज्यमंडळ** याचा अर्थ, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ (राज्यमंडळ) असा आहे.

(१.१४) **अन्य मंडळे** म्हणजे राज्यमंडळाव्यतिरिक्त इतर शिक्षण मंडळे जसे-सीबीएसई (CBSE), सीआयएससीई (CISCE), आयजीसीएसई (IGCSE), सीएआयई (CAIE) आयबी (IB), एनआयओएस (NIOS) तसेच महाराष्ट्राव्यतिरिक्त अन्य राज्यांची / देशांची मंडळे इत्यादी.

(१.१५) **द्विलक्षी अभ्यासक्रम/Bifocal Courses** म्हणजे, कला, वाणिज्य व विज्ञान शाखांमध्ये घेता येणारे व्यवसाय शिक्षण संचालनालयाचे (२०० गुणांचे) वैकल्पिक विषय होय.

(१.१६) **विभाग म्हणजे** राज्यातील प्रशासनासाठी महाराष्ट्र शासनाने स्थापन केलेले सहा महसुली विभाग. जसे- मुंबई, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, नागपूर.

(१.१७) विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालये आठ आहेत. जसे- मुंबई, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, नागपूर, कोल्हापूर व लातूर. शालेय शिक्षण विभागांतर्गत हे आठ विभाग आहेत.

1.12 **Online Admission Area :** Online Admission Zone means the zone in which admission to Class 11th has been decided to be done through the central online mode. This includes all the higher secondary/junior colleges affiliated to the State Board.

1.13 **State Board** means Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education.

1.14 **Other Boards** means the Education Boards other than the State Board viz. - CBSE, CISCE, IGCSE, CAIE, IB, NIOS and Boards of other States.

1.15 **Bifocal Courses** are those vocational subjects prescribed by the Directorate of Vocational Education and Training can be taken as an optional subject (200 marks) with Arts, Commerce or Science streams.

1.16 **Division :** The six Administrative Divisions established by the Government of Maharashtra viz - Mumbai, Pune, Nashik, Sambhajinagar, Amravati, Nagpur, Kolhapur, Latur.

1.17 Regional Deputy Director Offices are eight and they are located at Mumbai, Pune, Nashik, Chhatrapati Sambhajinagar, Amaravati, Nagpur, Kolhapur and Latur.

# हे लक्षात ठेवा

**उच्च माध्यमिक स्तरावर तीन शाखा आहेत :**
(१) कला (२) विज्ञान (३) वाणिज्य

**उच्च माध्यमिक विद्यालये**
**तीन गटात विभागली आहेत :**
(१) सहशिक्षण (२) मुलांचे (३) मुलींचे

**उच्च माध्यमिक विद्यालयाचे अनुदान प्रकारानुसार पाच प्रकार आहेत :**
(१) शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था
(२) अनुदानित (३) अंशत: अनुदानित
(४) विना अनुदानित (५) स्वयं:अर्थसहायित

**उच्च माध्यमिक विद्यालयातील अध्यापनाची माध्यमे :**
(१) मराठी (२) इंग्रजी (३) उर्दू (४) हिंदी
(५) गुजराती (६) कन्नड (७) सिंधी
(सर्वच उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये ही माध्यमे असतील असे नाही.)

**इ. ११वी मध्ये प्रवेश मिळविण्याचे दोन मार्ग**
(१) ऑनलाईन प्रवेशाच्या CAP जागा = विविध केंद्रीय प्रवेश फेऱ्यांतून वाटप
(२) कोटांतर्गत राखीव जागा = अल्पसंख्याक/इन-हाऊस/व्यवस्थापन कोटा

* *राज्यातील शिक्षण विभागाच्या मान्यतेनुसार सुरू असलेल्या उच्च माध्यमिक विद्यालयांना सदर केंद्रीय प्रवेश प्रक्रियेत सहभागी होणे बंधनकारक आहे.*
* *इ.११वीमधील ऑफलाईन पद्धतीने प्रवेश ग्राह्य धरले जाणार नाहीत व अशा विद्यार्थ्यांना १२वी बोर्ड परीक्षेत प्रविष्ट होता येणार नाही याची सर्वस्वी जबाबदारी संस्थेची असेल.*

डीटीपी आणि आतील सजावट : समृद्धी-९७३०९०६७५५

## Remember

**Higher Secondary level education is imparted through three Streams**
1) Arts, 2) Science, 3) Commerce,

**Junior Colleges are of three types**
1) Co-Education, 2) Boys, 3) Girls

**Junior Colleges are classified in five Aid-types**
1) Government/Local body, 2) Aided,
3) Partially Aided, 4) Unaided, 5) Self financed.

**Mediums of instruction**
1) Marathi, 2) English, 3) Urdu , 4) Hindi,
5) Gujarati, 6) Kannada, 7) Sindhi

**Two ways of 11th admission**
1) CAP seats = Admissions through allotment in various rounds
2) Quota seats = Minority/Inhouse/Management
(CAP- Centralised Addmission Porcess)

* **Admissions to all Jr. Colleges must be done through the online admission process only.**
* **Students are advised not to take admission except through online admission process. Offline admisssions will not be considered for 12th examination. Concerned Jr. College management will stand responsible for that.**

डीटीप आणि आतील सजावट : समृद्धी-९७३०९०६७५५

# 2 केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया समजावून घेऊ

## (अ) ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेची व्याप्ती :

(२.१) इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया, राज्यातील राज्यमंडळाशी संलग्न सर्व मान्यताप्राप्त उच्च माध्यमिक विद्यालयांना लागू राहील व त्यांना या प्रक्रियेत सहभागी होणे अनिवार्य राहील अर्थात, महाराष्ट्रातील सर्व उच्च माध्यमिक विद्यालयातील प्रवेश केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेद्वारे केले जातील.

(२.२) राज्यमंडळाव्यतिरिक्त अन्य मंडळांशी संलग्न उच्च माध्यमिक विद्यालयातील प्रवेश या प्रवेश प्रक्रियेद्वारे केले जाणार नाहीत. (अन्य मंडळांच्या विद्यार्थ्यांना राज्यमंडळाच्या इ. ११वीच्या वर्गात प्रवेश घ्यावयाचा असल्यास त्या विद्यार्थ्यांना या प्रवेश प्रक्रियेत सहभागी होता येईल).

(२.३) केंद्रीय ऑनलाईन प्रवेशासाठी, कला, वाणिज्य, विज्ञान या तीन शाखा उपलब्ध असतील.

(२.४) खालील प्रकारच्या उच्च माध्यमिक विद्यालयांना सदर केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया लागू असणार नाही.

(अ) रात्र उच्च माध्यमिक विद्यालय

(ब) सैनिकी उच्च माध्यमिक विद्यालय

(क) विशेष शाळा (दिव्यांग/अपंग विद्यार्थ्यांसाठीच्या शाळा).

(ड) एचएसव्हीसी (व्यावसायिक अभ्यासक्रम शाखा)

(इ) आदिवासी व अन्य विभागाच्या आश्रमशाळा इत्यादी.

(ई) राज्यमंडळाशी संलग्नित नसलेल्या उच्च माध्यमिक शाळा इ.

(२.५) महाराष्ट्रातील राज्यमंडळ संलग्न उच्च माध्यमिक महाविद्यालयात **प्रवेश घेण्यासाठी** कोणत्याही मंडळातून इ.१०वी किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यास इ.११वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेमध्ये सहभागी व्हावे लागेल.

# 2 The Centralised Online Admission Process

## A) Scope of the Online Admission Process :

2.1 The Std. 11th centralisd online admission process is applicable to all recognized Junior Colleges affiliated to the Maharashtra State Board and it is mandatory for all to participate in the online admission process, as all Higher Secondary admissions will be done through online process only.

2.2 Admissions in the Higher Secondary Schools affiliated to other boards (Excluding the Maharashtra State Board) will not be done through this admission process. (Other Boards' students who seek admission in to the State boards' Junior College can participate in this admission process.)

2.3 Arts, Commerce, Science streams will be available for Centralized Admission Process.

2.4 This centralised online Admission Process will not be applicable to the following institutions :

a) Night Junior Colleges.
b) Military Junior Colleges
c) Special Junior Colleges for Divyanga/Disabled students
d) HSVC (HSC- Vocational)
(e) Trible and other department Junior colleges i.e. Ashram School etc.
(f) Non Affiliated to State Boards schools and colleges.

2.5 Students, who have passed SSC or equivalent examination from any recognized board and seeking admission to Std. XI in any of the Jr. College in the Maharashtra State must participate in the online admission process.

## (ब) केंद्रीय प्रवेश प्रक्रियेची कार्यपद्धती (CAP) :

(२.६) इयत्ता ११वी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राज्यमंडळाचा इयत्ता १०वी परीक्षेचा ऑनलाईन निकाल लागल्यानंतर सुरू होईल. ऑनलाईन प्रवेश अर्जाचा भाग-१ व भाग-२ एकाच वेळी भरता येतील. त्यासाठी वेळोवेळी जाहीर होणारे वेळापत्रक पाहा.

(२.७) राज्यमंडळ इ.१०वी परीक्षेच्या ऑनलाईन निकालानंतर विद्यार्थ्यांना भाग-२ (पसंतीक्रम) भरता येईल व त्यानंतर इ.११वी केंद्रीय प्रवेशाकरिता पुढीलप्रमाणे विविध फेऱ्यांचे आयोजन करण्यात येईल -

१) **शून्य फेरी :** सदर फेरी नियमित फेरी १ सुरू होण्यापूर्वी /सोबत आयोजित करण्यात येईल. सर्वसाधारण गुणवत्ता यादी प्रसिद्ध करून अंतिम केली जाईल. व्यवस्थापन, इन हाऊस व अल्पसंख्याक कोटांतर्गत प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज करता येईल. तसेच या कालावधीत कोटांतर्गत प्रवेशाची अनुमती दिली जाऊ शकेल.

२) **चार नियमित फेऱ्या :** चार नियमित फेऱ्यांचे आयोजन केले जाईल. नियमित फेऱ्यांमध्ये सर्व शाखांचे प्रवेश गुणवत्तेनुसार, आरक्षणानुसार व विद्यार्थ्यांच्या पसंतीक्रमानुसार केले जातील. (सुलभतेसाठी पुढील पानावरील प्रवाह तक्ता-१ पाहा.) प्रत्येक फेरीपूर्वी पसंतीक्रम (भाग-२) मध्ये आवश्यकतेनुसार बदल करता येईल.

३) **विशेष फेऱ्या (ओपन टू ऑल) :** नियमित चार फेऱ्या संपल्यानंतर ओपन टू ऑल फेरीचे आयोजन केले जाईल. नियमित फेऱ्यांमध्ये प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांबरोबरच प्रतिबंधित केलेल्या सर्व विद्यार्थ्यांना ह्या फेरीमध्ये सहभागी होता येईल. (सर्वांसाठी खुली) या फेरीमध्ये प्रवेश केवळ गुणवत्तेनुसार होतील आरक्षण लागू नसेल.

(२.८) **द्विलक्षी विषयांचे प्रवेश** हे उच्च माध्यमिक विद्यालय स्तरावरून गुणवत्तानुसार करण्यात येतील.

(२.९) प्रवेश फेऱ्यांचे वेळापत्रक वेब पोर्टलवर वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात येईल. त्याचे नियमित अवलोकन व पालन करावे.

> या माहितीपुस्तिकेसोबतच वेब पोर्टलवर वेळोवेळी दिल्या जाणाऱ्या सूचना वाचा, वेब पोर्टलवरील सूचना यापेक्षा सुधारित व तात्कालिक असू शकतात.

## B) Procedure for The Centralised Admission Process (CAP) :

2.6 The centralised online Admission Process for Std. XI will commence after the declaration of online result of SSC (State Board), however application form part-1 and option form part-2 can be fill simultaneously of the online admission form can be filled before the SSC result. Kindly go through the schedule published from time to time.

2.7 After the online declaration of SSC exam. result, Part-2 option form will be opened for filling. After that, **various rounds for online admission will be held as under:**

1) **Zero Round :** This round will be conducted before or parallely with the regular rounds 1. During this round the general merit list will be finalized and Management quota, Inhouse quota and Minority quota Admissions too may be allowed.

2) **Four Regular Rounds :** Four regular rounds will be conducted for admission to all streams. CAP seats Allotment will be done as per merit, reservation and preferences given by the students. Preferences (Part-2) can be updated before every round. **(Refer the flow chart-1 for ease on the next page.)**

3) **Special Rounds (Open to all) :** After four regular rounds special round will be conducted. Students who have not been admitted still and those, who were restricted in earlier rounds can participate in this round. This round will be open for all. Admissions will be done purely on the basis of merit, no reservation will be applicable.

**2.8 Bifocal Admissions- The admission to the bifocal subjects will be done at Jr. College level as per merit.**

**2.9 The timetable of online admission rounds will be published on the portal. Students need to observe the instructions given carefully from time to time.**

**Kindly check instructions given on the portal from time to time along with this information booklet. As portal may show updated instructions.**



शैक्षणिक आणि आर्थिक मजकूर : समृद्धी-९४३०१०७०५

# केंद्रीय प्रवेश प्रक्रियेच्या फेऱ्या

**(प्रवाह तक्ता- १)**

**शून्य फेरी** — नियमित फेरी-१ साठी अर्ज (भाग १ व भाग-२) भरणे
कोटा प्रवेशासाठी अर्ज करणे व प्रवेश

↓ प्रत्येक फेरीसाठी (ऑनलाईन संमती देणे बंधनकारक)

**नियमित फेरी- १** — गुणवत्ता + आरक्षण + पसंतीक्रम

↓

**नियमित फेरी- २** — गुणवत्ता + आरक्षण + पसंतीक्रम

↓

**नियमित फेरी- ३** — गुणवत्ता + आरक्षण + पसंतीक्रम

↓

**नियमित फेरी- ४** — गुणवत्ता + आरक्षण + पसंतीक्रम

↓

**विशेष फेरी (ओपन टू ऑल)** — आवश्यकता भासल्यास अतिरिक्त विशेष फेऱ्यांचे आयोजन केले जाऊ शकते. (एटीकेटी व उर्वरित विद्यार्थ्यांसाठी)

* *केंद्रीय प्रवेशाच्या जागांवर (CAP) प्रवेश, नियमित फेरी-१ पासून होतील.*
* *शून्य फेरी नियमित प्रवेश फेऱ्यांच्या पूर्वतयारीसाठी असेल. शून्य फेरी दरम्यान नियमित फेरी - १ साठी पसंतीक्रम घेता येतील तसेच कोटांतर्गत प्रवेशासाठी पसंती देऊन कोटांतर्गत प्रवेश घेता येतील.*

**ऑनलाईन अर्ज आवश्यक :**

*राज्यमंडळाशी संलग्नित राज्यातील सर्व उच्च माध्यमिक विद्यालयात (कोणत्याही शाखेसाठी) प्रवेश मिळविण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याला केंद्रीय प्रवेश प्रक्रियेसाठी दिलेल्या वेब पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. राखीव कोट्यांतर्गत प्रवेश घ्यावयाचा असेल, तरीही ऑनलाईन प्रणालीद्वारे अर्ज करणे अनिवार्य आहे.*

***केवळ प्रवेश प्रक्रियेच्या वेब पोर्टलवर ऑनलाईन अर्ज भरूनच या प्रक्रियेमध्ये प्रवेश मिळवता येईल.***

# Centralised Admission Rounds

**(Flow Chart-1)**

**Zero Round** — Application for Regular Round-1 (Part-1 and Part-2)
Apply for Quota and Quota admissions

↓ (Online consent mandatory for every round)

**Regular Round - I** — Merit + Reservation + Preference order

↓

**Regular Round - II** — Merit + Reservation + Preference order

↓

**Regular Round - III** — Merit + Reservation + Preference order

↓

**Regular Round - IV** — Merit + Reservation + Preference order

↓

**Special Round (Open to all)** — Additional special rounds if required
(For ATKT and remaining Students)

* The centralised admissions on CAP seats will begin from Regular Round-1.
* Zero round is for preparation of CAP regular rounds. During this round preference filling for regular round -1, quota choices and quota addmissions can be done.

## Online Application Required :

Every Student who is desirous to take admission in any Junior College (To any of the stream) should apply online on the admission portal. For admission through any reserved quota one should also apply through this online admission process.

**No student can enter this admission process without online registration.**

## (क) राखीव कोट्यांतर्गत प्रवेश (QUOTA SEATS) :

(२.१०) उच्च माध्यमिक विद्यालयांमध्ये प्रवेशांसाठी केंद्रीय प्रवेशाच्या CAP जागांव्यतिरिक्त संस्थांतर्गत इनहाऊस कोटा, व्यवस्थापन कोटा व अल्पसंख्याक शाळांसाठी अल्पसंख्याक कोटा राखीव असेल.

(२.११) कोट्यांतर्गत प्रवेशासाठीसुद्धा विद्यार्थ्याने ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. आणि कोटा प्रवेशासाठी Apply for Quota करावे.

**(२.१२) इनहाऊस कोटा :** (संस्थांतर्गत कोटा)

१) उच्च माध्यमिक विद्यालय चालविणाऱ्या संस्थेने चालविलेल्या माध्यमिक शाळांमधील (त्याच परिसरातील) इ.१०वी उत्तीर्ण विद्यार्थी ह्या कोट्यांतर्गत प्रवेशासाठी पात्र असतील.

२) या कोट्यांतर्गत सर्व उच्च माध्यमिक विद्यालयांमध्ये **१०% जागा** राखीव असतील. त्याच संस्थेची/ त्याच परिसरातील इ.१०वी वर्ग असलेली माध्यमिक शाळा नसेल, अशा उच्च माध्यमिक विद्यालयात इनहाऊस कोटा लागू होणार नाही.

३) उच्च माध्यमिक विद्यालयांना इनहाऊस कोट्यामधील जागा प्रवेश प्रक्रियेची नियमित फेरी-२ संपेपर्यंत भरता येतील तसेच प्रत्यार्पित करता येतील. तद्नंतर रिक्त जागा प्रत्यार्पित करणे अनिवार्य असेल. एकदा प्रत्यार्पित केलेल्या जागा परत करता येणार नाहीत.

४) शासकीय शाळा व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील विद्यार्थ्यांकरिता ५०% इनहाऊस कोटा लागू असेल.

**(२.१३) व्यवस्थापन कोटा :**

१) या कोट्यांतर्गत सर्व उच्च माध्यमिक विद्यालयांमध्ये **५% जागा** राखीव असतील. यामधील प्रवेश व्यवस्थापन संस्था त्यांच्या स्तरावर गुणवत्तेनुसार करतील व आनलाईन प्रवेश प्रक्रियेच्या पोर्टलवर नोंदवतील.

२) उच्च माध्यमिक विद्यालयांना व्यवस्थापन कोट्यामधील जागा प्रवेश प्रक्रियेच्या दुसऱ्या फेरीपर्यंत भरता येतील व त्यानंतर प्रत्यार्पित करणे अनिवार्य राहील.

**(२.१४) अल्पसंख्याक कोटा :**

१) अल्पसंख्याक उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये केवळ अल्पसंख्याक (धार्मिक/भाषिक) समुदायाच्या विद्यार्थ्यांसाठी या कोट्यांतर्गत **५०% जागा** राखीव असतील.

२) या कोट्यातून प्रवेशासाठी केवळ अल्पसंख्याक (ख्रिश्चन, जैन, बौद्ध, मुस्लिम, शीख, पारशी इ. धार्मिक अल्पसंख्याक व भाषिक अल्पसंख्याक) विद्यार्थी पात्र असतील.

३) अल्पसंख्याक उच्च माध्यमिक विद्यालयांना अल्पसंख्याक कोट्यांतर्गत उपलब्ध असणाऱ्या जागा नियमित तीन फेऱ्या संपेपर्यंत भरता येतील. अल्पसंख्याक कोट्यातील रिक्त जागा राहिल्यास तीन नियमित फेऱ्या संपल्यानंतरच CAP कडे प्रत्यार्पित करता येतील.

**तीनही कोट्यांतर्गत देण्यात आलेले प्रवेश, त्वरित/तात्काळ प्रवेश प्रक्रियेच्या वेब पोर्टलवर नोंदविणे उच्च माध्यमिक विद्यालयास बंधनकारक आहे.**

## C) Admission to Quota Seats:

2.10 For admission in Junior College, Inhouse Quota, Management Quota and Minority quota in minority Jr. Colleges will be reserved. These seats are in addition to CAP seats.

2.11 It is also necessary to fill online form for the admission under any above quota. Check apply for Quota in student login.

**2.12 Inhouse Quota :** (Intra Institutional Quota)

1) Under this quota, all Junior Colleges will have 10% seats reserved. If the educational institute has no secondary school of std. 10th, they will not have such inhouse quota.
2) Students who have passed std. 10th from secondary school (within same premisses) of the same management who run Junior Colleges are eligible for Inhouse quota admission in those Jr. Colleges.
3) Junior Colleges can fill inhouse Quota seats till the end of regular round-2 only and thereafter vaccant seats (if any) must be surrendered. Once surrendered its will not be reverted.
4) 50% in-house quota will be in government schools and local government schools.

**2.13 Management Quota :**

1) Under this quota, 5% seats will be reserved in all Jr. Colleges. Admission for this quota will be done at the management level on merit basis. Admitted students data will be updated on the portal.
2) Junior Colleges can fill management quota till the end of regular round-2 thereafter vacants seats have to be surrendered to the CAP.

**2.14 Minority Quota :**


1) Under this quota 50% seats will be reserved in minority Junior Colleges. For the students of minority community (religious / linguistic) only.
2) For this quota admission, the minority students (Christian, Jain, Buddhist, Muslim, Sikh, Parshi etc. religious or linguistic minority) are eligible.
3) Minority quota seats can be filled by the end of three regular rounds and the vacant seats of minority quota if so, can be surrendered to CAP after three regular rounds only.

**It is mandatory for Jr. College to update the admissions done through any of the Quota, on the portal of centralised admission process ASAP.**

डीटीप आणि आतील सजावट : समृद्धी-९७३०९०६७५५

# कोट्यांतर्गत प्रवेशासाठी दिशादर्शक

**(प्रवाह तक्ता- २)**




१) कोटांतर्गत राखीव जागांवरील प्रवेश गुणवत्तेनुसार केले जातील. त्यामध्ये ऑनलाईन अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांनाच संधी दिली जाईल. कोटा प्रवेशासाठी ऑनलाईन पसंती दिलेल्या विद्यार्थ्यांची यादी विद्यालयांना मिळेल.

२) त्याच परिसरातील माध्यमिक (इ.१०वी) शाळा नसेल त्या संस्थेच्या उच्च माध्यमिक विद्यालयात संस्थांतर्गत इनहाऊस कोटा लागू असणार नाही.

३) अल्पसंख्याक कोटा केवळ अल्पसंख्याक उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये, अल्पसंख्याक समुदायाच्या विद्यार्थ्यांसाठी राखीव असेल. बिगर अल्पसंख्याक विद्यालयात अल्पसंख्याक कोटा असणार नाही.


४) अल्पसंख्याक विभागाच्या नियमानुसार अल्पसंख्याक कोटा जागांवरील प्रवेशात संबंधित संस्थेस प्राप्त दर्जाच्या अल्पसंख्याक समूहातील विद्यार्थ्यांना अग्रक्रम देण्यात येईल. सदर समूहातील पुरेसे विद्यार्थी उपलब्ध न झाल्यास इतर अल्पसंख्याक (धार्मिक/भाषिक) समूहातील विद्यार्थ्यांना अंतर्गत प्रवेश देता येतील आणि शेवटी रिक्त जागा खुल्या प्रवेशासाठी केंद्रीय प्रवेशासाठी प्रत्यार्पित करता येतील.



डीटीपी आणि आतील सजावट : समृद्धी-९७३०९०६७५५

# Quota Admission Guidance Chart

**(Flow Chart-2)**




1) Admissions to Quota seats will be done from students who have applied through this online process only. A list of applied students will be provided to Jr. Colleges.

2) If Jr. College Guardian sanstha has running no secondary (10th) school in same premises, then the Jr. College will have no **Inhouse** quota.

3) Minority quota is reserved in minority Jr. Colleges, only for minority students. There will be no minority quota in non-minority Junior Colleges.

4) As per the rules of minority department, priority shall be given in the admission to minority quota seats, to the students belonging to the minority group of obtained minority status by the concern institution. If there are no enough students from this group, then admission to the other minority community students (religious/linguistic) can be given step by step and finally vacant seats can be surrendered to CAP seats for open admissions.

## ड) प्रवेशासाठी राखीव जागा (आरक्षण) :

(२.१५) सर्व उच्च माध्यमिक विद्यालयातील प्रवेश हे प्रचलित नियमानुसार वैधानिक (घटनात्मक) व विशेष आरक्षणांची टक्केवारी विचारात घेऊन दिले जातील.

### १) संविधानिक/सामाजिक आरक्षणांतर्गत राखीव जागा (बिगर अल्पसंख्याक शाळा)

| क्र. | प्रवर्ग | आरक्षित जागा |
|---|---|---|
| १. | अनुसूचित जाती (SC) | १३% |
| २. | अनुसूचित जमाती (ST) | ०७% |
| ३. | विमुक्त जाती-अ (VJ-A) | ०३% |
| ४. | भटक्या जमाती-ब (NT-B) | २.५% |
| ५. | भटक्या जमाती-क (NT-C) | ३.५% |
| ६. | भटक्या जमाती-ड (NT-D) | ०२% |
| ७. | विशेष मागास प्रवर्ग (SBC) | ०२% |
| ८. | इतर मागासवर्गीय (OBC) | १९% |
| ९. | सामाजिक व शैक्षणिक मागासवर्ग (SEBC) | १०% |
| १०. | आर्थिक दुर्बल घटक (EWS) (खुल्या प्रवर्गातून) | १०% |
| | खुल्या प्रवेशासाठी (GEN) | २८% |

**टीप :** *अधिसूचना दि. २६/१२/२०२४ व शा.नि. २७/२/२०२४ नुसार सामाजिक आणि शैक्षणिक मागासवर्गाकिरिता १०% आरक्षण देण्यात येत आहे.*

### २) कोटानिहाय राखीव जागा

| कोटा | अल्पसंख्याक उच्च माध्यमिक विद्यालये | बिगर अल्पसंख्याक उच्च माध्यमिक विद्यालये | शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांची उच्च माध्यमिक विद्यालये |
|---|---|---|---|
| इनहाऊस कोटा | १० % | १० % | ५०% |
| व्यवस्थापन कोटा | ५ % | ५ % | लागू नाही |
| अल्पसंख्याक कोटा | ५० % | लागू नाही | लागू नाही |

**टीपा :**

१) ज्या उच्च माध्यमिक विद्यालयाच्या आवारात त्याच संस्थेची माध्यमिक (इ. १०वी) शाळा नाही त्या उच्च माध्यमिक विद्यालयासाठी इनहाऊस कोटा लागू होणार नाही.

२) कोटांतर्गत प्रवेशासाठी नियमानुसार लागू होणारे आरक्षण केंद्रीय प्रवेशाच्या (CAP) जागांमध्ये समायोजित केले जाईल.

डीटीप आणि आतील सजावट : समृद्धी-९७३०९०६७५५

## D) Reserved seats for Admission :

2.15 Admissions will be given as per the constitutional reservation as well as special reservation applicable as per the existing rules.

**1) Reserved seats as per constitutional/ social reservation (Non-Minority Institutes):**

| Sr. No. | Catagory | Reserved Seats |
|---|---|---|
| 1) | Scheduled Castes (SC) | 13% |
| 2) | Scheduled Tribes (ST) | 07% |
| 3) | Vimukta Jati (VJ-A) | 03% |
| 4) | Nomadic Tribes (NT-B) | 2.5% |
| 5) | Nomadic Tribes (NT-C) | 3.5% |
| 6) | Nomadic Tribes (NT-D) | 2% |
| 7) | Special Backword Class (SBC) | 2% |
| 8) | Other Backword Class (OBC) | 19% |
| 9) | Socially and Educationally Backward Class (SEBC) | 10% |
| 10) | Economically Weaker Section (EWS) (within Gen.) | 10% |
| | For Open Admission (GEN) | 28% |

**NB :** Socially and Educationally backward class 10% reservation. As per notification dated 27-2-2024 and 26-12-2024.

**2) Reserved seats under Quota :**

| Quota | Minority Jr. Colleges | Non minority Jr. Colleges | Government and Local body run Jr. colleges |
|---|---|---|---|
| Inhouse Quota | 10% | 10% | 50% |
| Mangement Quota | 5% | 5% | Not Applicable |
| Minority Quota | 50% | Not Applicable | Not Applicable |

**Notes :**

1. If the guardian institute is not running any secondary school within the same premises of Jr. college then the concerned Jr. College will not get inhouse quota.
2. Any reservation applicable to quota admissions as per the rules will be adjusted while CAP admission.



डीटीप आणि आतील सजावट : समृद्धी-९७३०९०६७५५

## ३)समांतर आरक्षण/विशेष आरक्षण प्रवर्ग

| अ.क्र. | विशेष आरक्षण | राखीव जागा |
|---|---|---|
| १. | महिला | ३० % |
| २. | दिव्यांग/अपंग | ४ % |
| ३. | प्रकल्पग्रस्त व भूकंपग्रस्त | २ % |
| ४. | अ) बदलीने आलेल्या राज्यशासन/केंद्रशासन/ खाजगी क्षेत्रातील कर्मचारी यांचे पाल्य.<br>ब) आजी-माजी सैनिकांच्या पत्नी/पाल्य स्वातंत्र्य सैनिकांचे पाल्य<br>क) आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये विजेते/सहभागी खेळाडू विद्यार्थी व राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये पदकविजेते खेळाडू. | ५ % |
| ५. | अनाथ मुले (खुल्या प्रवर्गातून) | १% |
| | उर्वरित जागा (सर्वसाधारण जागा) | ५८% |

टिपा-१) समांतर आरक्षण हे कप्पीकृत असल्याने उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये जागा निश्चित करताना केवळ सामाजिक आरक्षणाची संख्या नमूद न करता समांतर आरक्षणाच्या जागांची निश्चिती करून घेतली जाईल.

२) सामान्य प्रशासन विभागाच्या. दिनांक १३-८-२०१४ व दिनांक १९-१२-२०१८च्या परिपत्रकानुसार समांतर आरक्षणाच्या जागा संबंधित सामाजिक आरक्षणाच्या प्रवर्गातून भरणे आवश्यक आहे.

३) सामाजिक व समांतर आरक्षणानुसार विद्यार्थी उपलब्ध न झाल्यास सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ५-१२-२०१४ व दिनांक २८-१२-२०१८च्या शासन निर्णयानुसार उर्वरित रिक्त जागा सर्वसाधारण प्रवर्गात परिवर्तित करण्यात येतील. सदर जागा गुणवत्तेनुसार भरण्यात येतील.

४) केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेसाठी (कोट्यांतर्गत प्रवेश वगळून) उपलब्ध होणाऱ्या जागांवरील (प्रत्यार्पित केलेल्या जागांसह) सर्व प्रवेश लागू होत असलेल्या आरक्षणानुसार होतील.

**व्यावसायिक अभ्यासक्रम :**

व्यावसायिक अभ्यासक्रमाबाबत अधिक माहितीसाठी जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालयाशी संपर्क साधावा. त्याठिकाणी द्विलक्षी अभ्यासक्रम अंतर्गत उपलब्ध होणाऱ्या संधी याबाबत मार्गदर्शन मिळेल.

## 3) Parallel reservation/Special reservation

| Sr. No. | Special Reservation | Reserved Seats Jr. Colleges |
|---|---|---|
| 1. | Women | 30% |
| 2. | Divyang/Disabled | 4% |
| 3. | Project Affected/Earthquake Affected | 2% |
| 4. | a) Wards of transfered employee of state government/central government/private sector.<br>b) Wife/Wards of servicemen/Ex-servicemen/ Freedom fighters<br>c) Winners or participant student players at international level and medal winners at national level | 5% |
| 5. | Orphan Children (Within General Category) | 1% |
| | Remaing seats (Pure) | 58% |

**NB :** 1) Parallel reservation is a compartmental reservation, so the Junior college should confirm the seats for parallel reservation while defining the seat matrix instead, just mentioning of social reservation.

2) As per the general administration department circular dated 13.08.2014 and 19-12-2018, it is mandatory to fill up the seats of parallel reservation through the concerned social reservation catgory.

3) In case of unavalibility of students as per social and parallel reservation, the remaining vacant seats (as per circular of General Administration Dept. dated 5/12/2014 and 28-12-2018) will be converted to general seats and these admissions will be done on merit basis.

4) All admissions (excluding quota admissions), in centralized admission rounds (including the surrendered seats) will be done as per reservation policy.

**Vocational Courses :**

For detailed information regarding vocational/Bifocal subjects you can approach The District Vocational Education and Training office. You may get to know the opportunities through vocational education there.

डीटीप आणि आतील सजावट : समृद्धी-९७३०९०६७५५

## इ) शालेय शुल्क :

(२.१६) उच्च माध्यमिक विद्यालयातील अनुदानित तुकड्यांसाठी शासन नियमाप्रमाणे शुल्क आकारले जाते.

(२.१७) विनाअनुदानित, स्वयंअर्थसहाय्यित उच्च माध्यमिक विद्यालयांचे शुल्क संबंधित व्यवस्थापनामार्फत, महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम २०११ नुसार निश्चित केले जाते. त्यामुळे वेगवेगळया उच्च माध्यमिक विद्यालयांचे शुल्क वेगवेगळे असू शकते.

(२.१८) अनुदानित उच्च माध्यमिक विद्यालयातील विना अनुदानित तुकड्यांसाठी उच्च माध्यमिक विद्यालय स्तरावरून वेगळे शुल्क आकारले जाते. त्यामुळे एकाच विद्यालयात अनुदानित, विनाअनुदानित तुकड्यांसाठी वेगवेगळे शुल्क असू शकेल.

(२.१९) द्विलक्षी व माहिती तंत्रज्ञान अशा अतिरिक्त विषयांचे शुल्क वेगळे असू शकेल.

(२.२०) उच्च माध्यमिक विद्यालयातील शुल्काबाबतची माहिती वेब पोर्टलवर उपलब्ध आहे.

(२.२१) प्रवेश निश्चित केलेल्या विद्यार्थ्याने पहिल्या २० दिवसात प्रवेश रद्द केल्यास जमा केलेल्या एकूण शुल्कापैकी ५ टक्के कपात करण्यात येईल त्यानंतर ४० दिवसात प्रवेश रद्द केल्यास १० टक्के कपात करण्यात येईल. तद्नंतर प्रवेश रद्द केल्यास कोणतेही शुल्क परत मिळणार नाही.

---

(२.२२) सदर प्रवेश प्रक्रियेसाठी प्रक्रिया शुल्क रुपये १०० एवढे आकारण्यात येईल. हे शुल्क अर्जाचा भाग-१ भरताना ऑनलाईन भरावे लागेल.

(२.२३) प्रवेश प्रक्रिया शुल्क भरण्यासाठी वेब पोर्टलवर सर्व प्रकारच्या ऑनलाईन पेमेंट सुविधा उपलब्ध आहेत. जसे- १) छशीं इरपज्ञळपस, २) उरीव, ३) थरश्रश्रशीं, ४) णझख ग्रिशर्पी, शींल.

(२.२४) आपणास लागू होणारे प्रवेश प्रकिया शुल्क वेब पोर्टलवर आपोआप दर्शविले जाईल. सदर शुल्क केवळ ऑनलाईन पद्धतीने भरावयाचे आहे. रोख रक्कम स्वीकारली जाणार नाही.

डीटीपी आणि आतील सजावट : समृद्धी-९७३०१०६७५५

## E) School Fees :

2.16 In aided divisions of Jr. Colleges fees is charged as per the government rates.

2.17 The Fee of the unaided, self-financed Jr. College is decided as per Maharashtra Educational Institutes (regulation of fees) Act 2011 by the school management, **so the various Jr. Colleges may have different fees.**

2.18 Thus there can be different fee structures for **aided and unaided** divisions in the same Jr. College.

2.19 For **Bifocal and information Technology (IT)** subjects, fee may be charged seperately.

2.20 Fee structure is available on portal.

2.21 If a student who has confirmed admission cancels the admission, 5 percent of the total fee collected will be deducted if the admission is cancelled within the first 20 days, and 10 percent will be deducted if the admission is cancelled within the next 40 days. No refund will be given if the admission is cancelled after that.

---

2.22 A processing fee of Rs. 100 will be charged for this admission process. This fee will have to be paid online while filling out Part 1 of the application form.

2.23 All available modes of online payment are made available to collect fees on the portal. viz. - 1) Net Banking, 2) Card, 3) Wallet, 4) UPI payment, etc.

2.24 Applicable admission processing fee will be displayed on screen automatically. You have to pay the fee online only. Cash will not be accepted.

# 3 विद्यार्थी नोंदणी व ऑनलाईन प्रवेश अर्ज भरणे

## अ) सर्वसाधारण बाबी :

१) प्रत्येक विद्यार्थ्यास एकच अर्ज भरता येईल. त्यासाठी प्रथम ऑनलाईन विद्यार्थी नोंदणी करावी.

२) केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेचा अर्ज वेब पोर्टलवर दोन भागांमध्ये भरावयाचा आहे भाग-१ (वैयक्तिक माहिती) व भाग-२ फक्त पसंतीक्रम भरणे.

३) अर्जाचा भाग-१ भरण्याची सुविधा विद्यार्थी नोंदणीनंतर उपलब्ध होईल. या भागातील माहिती एकदाच भरून प्रमाणित (verfy) करून घ्यावयाची आहे.

४) अर्जाचा भाग-२ भरण्याची सुविधा भाग-१ भरून पूर्ण झाल्यानंतर उपलब्ध होईल. तसेच प्रत्येक फेरीपूर्वी भाग-२ मधील माहिती/पसंतीक्रम अद्ययावत करता येईल.

## (ब) ऑनलाईन विद्यार्थी नोंदणी :

(१) प्रवेश प्रक्रियेची माहितीपुस्तिका वेब पोर्टलवर उपलब्ध आहे त्याचे वाचन करा.

(२) नमुना अर्ज भरण्यापूर्वी माहितीपुस्तिका काळजीपूर्वक वाचा व संपूर्ण प्रवेश प्रक्रिया समजून घ्या. यासाठी आपल्या शाळेची अथवा मार्गदर्शन केंद्राची मदत घ्या. (हेल्पलाईन क्रमांक मुखपृष्ठावर दिला आहे.)

(३) प्रवेशासाठी योग्य वेब पोर्टल उघडा व STUDENTS REGISTRATION सुरू करा.

(४) वेब पोर्टलवर नोंदणी करताना तुमचा इ.१०वीचा बैठक क्रमांक, नाव, आईचे नाव व मोबाईल नंबर टाकल्यानंतर आपला भ्रमणध्वनी किंवा मेल आयडी नमूद करावा. तद्नंतर लॉगीन आयडी तुम्हास प्राप्त होईल, पासवर्ड तुम्हास स्वत: तयार करावयाचा आहे. मिळालेले लॉगीन आयडी व पासवर्ड लॉगीन करण्यासाठी वापरा. (लॉगीन आयडी व पासवर्ड जपून ठेवा.)

(५) तुमचा लॉगीन आयडी व पासवर्ड एसएमएसद्वारे तुमच्या मोबाईलवर व आपण नोंदविलेल्या ई-मेलवर सुद्धा पाठविला जाईल. जर संदेश आला नाही, तर नोंदणीनंतर स्क्रीनवर दाखवलेला लॉगीन आयडी नोंदवून ठेवा.

(६) नोंदणी करताना निवडलेल्या सिक्युरिटी प्रश्नाचे उत्तर लक्षात ठेवा. सिक्युरिटी प्रश्न व पासवर्ड याची प्रिंट घ्या व जपून ठेवा (आपला पासवर्ड इतर कोणासही सांगू नका. )

## क) प्रवेश अर्ज कसा भरावा (भाग-१) :

(७) तुम्हाला मिळालेल्या लॉगीन आयडी व पासवर्डच्या सहाय्याने लॉगीन करा व संगणकावर दिलेल्या सूचनांप्रमाणे टप्प्याटप्प्याने ऑनलाईन अर्ज भरा.

(८) महाराष्ट्र राज्यमंडळाच्या चालू वर्षी मार्चमध्ये घेण्यात आलेल्या इ.१०वी परीक्षेस नियमित बसलेल्या विद्यार्थ्यांनी त्यांचा बैठक क्रमांक टाकल्यावर त्यांची वैयक्तिक माहिती आपोआप येईल, ती तपासून घ्या. आपोआप येणाऱ्या वैयक्तिक माहितीमध्ये काही दुरुस्ती हवी असल्यास शाळा / मार्गदर्शन केंद्रातून दुरुस्ती करून घ्या. (Grievance Redressal सुविधेचा उपयोग करा.)

महाराष्ट्र राज्यमंडळाच्या मार्च २०२५ मधील इ. १०वी परीक्षेच्या विद्यार्थ्यांची माहिती/वरील या प्रक्रियेसाठी वापरण्यात येणार आहे. त्यामुळे राज्यमंडळाच्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रवेश अर्ज भरताना त्यांचा बैठक क्रमांक टाकल्यानंतर त्यांची वैयक्तिक माहिती प्रवेश अर्जामध्ये आपोआप दर्शविली जाईल (Auto fill). इतर मंडळाचे विद्यार्थ्यांना अर्जातील माहिती स्वत:/manually भरता येईल.

# 3 Student Registration and Online Application Form

## A) Common but important :

1. Every student can fill only one form. For this begin with student registration.
2. Online admission form must filled in two steps. Part-1 (Personal information) and Part-2 (Preference order).
3. Part-1 (Application form) will be available to fill after student registration. The information of this part has to be filled and get verified only once.
4. Process to fill up Part-2, will be available after the submission of Part-1. Before every round, Part-2 (option form) can be updated or submitted.

## B) Online student registration Process :

1) The information Booklet is available on the portal, go through it.

2) Before filling out the admission form, read information booklet carefully and try to understand the whole admission process. For this you may seek help of your school/ Guidance Centre and helpline number given on front page of this booklet.

3) Go to the given portal start and start STUDENTS REGISTRATION.

4) During registration, after providing your Std. 10th Seat No., student's name, mother's name Login ID will be generated online, you have to set password yourself. Remember it and use the same for Login.

5) Your login ID and Password will be sent to your mobile number through SMS too. If no message is recieved kindly note down the login ID shown on screen at registration.

6) Do remember the answer given to the security questions. Take print of security questions and password, preserve it carefully. (**Never disclose your password to anyone**).

## C) How to fill Application form (Part-1 ) :

7) Get youself Logged in using your Login ID and Password, Fill the online application form step by step, following the instructions displayed there.

8) The information of regular students appearing for the Maharashtra State Board's SSC Exam. held in March of the current year, will appear automatically on the screen, after entering their SSC seat No. Check the same information carefully. If required get it corrected from Guidance Centre/Secondary School or through Grievance Redressal.

The student data of SSC Examination with the Maharashtra State Board will be used for this online admission process. The SSC students appearing for March 2025 examination, can avail and get filled in their personal details on just entering their seat number **automatically**. (Auto Fill) whereas other board's students can fill in their personal details **manually** by themselves.

(९) ज्या विद्यार्थ्यांची माहिती वेब पोर्टलवर बैठक क्रमांक टाकल्यावर येणार नाही, त्यांनी तसेच अन्य मंडळाच्या विद्यार्थ्यांनी सर्व माहिती स्वत: भरावयाची आहे किंवा डिजी लॉकर किंवा APF द्वारे घेण्यात येणार आहे.

(१०) तुम्हाला तुमचा अर्ज ऑनलाईन भरता येईल, तसेच अर्ज भरण्याची सुविधा मोबाईलवरही उपलब्ध आहे. संपूर्ण अर्ज (भाग-१) भरून झाल्यानंतर अर्जातील माहिती (स्वत:चे नाव, आईचे नाव, जन्म तारीख, जात प्रवर्ग, आरक्षण इत्यादी) अचूक असल्याची खात्री करा व शुल्क भरून अर्ज लॉक करा.

(११) आवश्यक कागदपत्रे अपलोड करा. (ती स्पष्ट व वाचनीय असावीत. तसेच त्यांचा आकार १-एमबी पेक्षा जास्त नसावा.) अपलोड करावयाच्या आवश्यक कागदपत्रांचा तपशील वेब पोर्टल आपोआप दर्शवेल.

(१२) आपण अपलोड केलेली प्रमाणपत्रे व अर्जामध्ये आपण भरलेली माहिती योग्य आहे याची खात्री स्वत: करा.

(१३) अर्ज भाग-१ भरून झाल्यावर (Dashboard) तपासावा. तेथे VERIFIED असणे आवश्यक आहे. अपूर्ण अर्ज प्रवेश प्रक्रियेसाठी विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच त्यांना भाग-२ (पसंतीक्रम) भरता येणार नाही.

(१४) आपल्या अर्जाची प्रिंट काढून स्वत:कडे ठेवावी. प्रवेश अर्ज सादर (Lock/Verify) केल्यानंतर ज्यांना भाग-१ मधील माहितीमध्ये काही दुरुस्ती करावयाची असेल त्यांना आपल्या जवळच्या मार्गदर्शन केंद्राकडून दुरुस्ती करून घेता येईल. किंवा अर्ज स्वत: UNLOCK करून त्यात बदल करता येईल.

(१५) प्रवेश अर्ज भाग-१ मध्ये विद्यार्थ्याने भरलेली माहिती व अपलोड केलेली कागदपत्रे प्रवेश निश्चित करताना उच्च माध्यमिक विद्यालये काळजीपूर्वक तपासतील. त्यामध्ये काही तफावत/भिन्नता आढळल्यास प्रवेश नाकारला जाईल.

(१६) प्रवेश अर्ज भाग-१ प्रमाणित करण्याची स्वतंत्र सुविधा असणार नाही. त्यामुळे ही जबाबदारी उच्च माध्यमिक विद्यालयाची असेल. आपला प्रवेश नाकारला जाऊ नये म्हणून विद्यार्थ्यांनी अर्जामध्ये भरताना ती जबाबदारीने व खात्रीपूर्वक भरावी.

(१७) विद्यार्थ्याने ऑनलाइन प्रवेश अर्जातील मजकूर व प्रत्यक्षात प्रवेशाच्या वेळी सादर केलेली कागदपत्रे व माहितीमध्ये तफावत आढळल्यास त्यास विशेष फेरीपर्यंत प्रवेश प्रक्रियेपासून वंचित ठेवण्यात येईल. परंतु सर्वांसाठी खुल्या विशेष फेरीमध्ये प्रवेश घेण्यास संबंधित विद्यार्थी पात्र असेल. तथापि इयत्ता दहावीच्या गुणपत्रकामध्ये फेरफार असल्यास पुढील कोणत्याही फेरीसाठी विद्यार्थी पात्र असणार नाही.

---

टीप : आवश्यक कागदपत्रे अपलोड करण्याची सुविधा भाग-१ भरताना आणि अलॉटमेंटनंतर प्रवेशाच्या वेळी दिली जाईल.

---



डीटीपी आणि आतील सजावट : समृद्धी-९७३०१९७५९५

9) After entering the SSC seat number, if information is not displayed, students (State board or other boards) should fill the information manually by themselves or data will fetch through digilocker.

10) Fill online admission form preferably at home. The form filling facility is also available in the mobile App. After filling (Part-1) of application form, verify the information filled (Like- Name, Mother's name, Date of birth, Category, Reservation etc.) again and after that pay the fee and lock your form.

11) Upload required documents. (Kindly ensure the documents uploaded are clear and readable. Remember the size of a document should not be larger than 1MB.) The list of required documents to be uploaded will be shown on portal automatically.

12) Befor you locked the Application form, reconfirm that you have tendered the correct information only.

13) After submission of online application form check "DASHBOARD", it must be VERIFIED. Those students who won't get their form verified, such forms will not be considered for further online admission process or Part-2.

14) Keep a print copy of your form for further reference. Those who are willing to make changes in his/her form after submission, they can approach to any Guidance Centre you can UNLOCK and edit the information filled in your form.

15) The Jr. Colleges will carefully check the information filled by the students in Part-1 of the Admission Form and the uploaded documents while securing admission. If any discrepancy is found in it, the admission will be rejected.

16) There will be no separate facility to verify the Application Form Part-1. Therefore, this responsibility will remain with the Jr. Colleges. Students should fill it responsibly and accurately while filling the application form so that their admission is not rejected.

17) If a student finds any discrepancy between the information and documents submitted by him/her in the online admission form and the information submitted at the time of admission, he/she will be disqualified from the admission process till the special round, but the student will only be eligible for admission in the special open to all round. However, if there is any change in the grade 10 mark sheet, the student will not be eligible for any subsequent round.

**Note : Documents upload facility is made available online at Part-1 and after the allotment before admission too.**

## ड) प्रवेश अर्ज भाग-२ (पसंतीक्रम नोंदविणे) :

(१७) अर्जाचा भाग-१ व भाग-२ भरण्याची कार्यवाही वेळापत्रकानुसार सुरू होईल.

(१८) वरीलप्रमाणे भाग-१ मधील माहिती प्रमाणित (Verify) केल्यानंतरच प्रवेश अर्जाचा भाग २ (पसंतीक्रम) विद्यार्थ्यांना भरता येईल.

(१९) भाग-२ सुरू झाल्यावर राज्यमंडळाच्या (चालू वर्षीच्या) नियमित विद्यार्थ्यांचे इयत्ता दहावीचे सर्वोत्तम पाच (Best of Five) विषयांचे मिळालेले गुण व शेकडा गुण आपोआप दिसतील.

(२०) ज्या विद्यार्थ्यांचे गुण आपोआप येणार नाहीत त्यांनी तसेच इतर मंडळाच्या विद्यार्थ्यांनी त्यांचे इयत्ता दहावीचे एकूण गुण स्वत: (Manually) अचूक नोंदवावेत. किंवा आपला डाटा संबंधित मंडळाकडून घेण्यात येईल.

(२१) प्रवेशासाठी एका शाखेची व एका माध्यमाची निवड करावी, त्यानंतर ती शाखा/माध्यम असणाऱ्या सर्व उच्च माध्यमिक विद्यालयांची यादी विद्यार्थ्यास दर्शविली जाईल. त्यानुसार पसंतीक्रम ठरवावा.

(२२) प्रवेशासाठी आपल्या पसंतीची किमान-१ व कमाल-१० उच्च माध्यमिक विद्यालये निवडा व त्यांचा प्राधान्यक्रम निश्चित करा. त्यानंतर अर्जाची प्रिंट घ्या व जपून ठेवा.

* त्यासोबतच कोटा प्रवेशासाठी इच्छित विद्यालयांसाठी ऑनलाईन पसंती नोंदवावी.

(२३) फेरीत प्रवेशासाठी विद्यार्थ्यांची गुणवत्ता (इ.१०वीचे गुण), आरक्षण व विद्यार्थ्यांनी उच्च माध्यमिक विद्यालयाचा दिलेला पसंतीक्रम विचारात घेतला जाईल. सबब आपले पसंतीक्रम योग्य पद्धतीने नोंदवा.

(२४) वेळापत्रक व प्रवेशाची कार्यपद्धती वेळोवेळी वेब पोर्टलवर जाहीर करण्यात येईल. त्यासाठी वेब पोर्टलला सतत भेट देत राहा.

### प्रत्येक फेरीसाठी संमती नोंदविणे -

* प्रत्येक फेरीपूर्वी विद्यार्थ्यास पसंतीक्रम देण्याची अथवा त्यामध्ये बदल करण्याची संधी दिली जाईल.
* प्रत्येक फेरीपूर्वी विद्यार्थ्याने ऑनलाईन संमती नोंदविणे अनिवार्य असेल. जे विद्यार्थी संमती नोंदविणार नाहीत त्यांचा त्या फेरीसाठी विचार केला जाणार नाही.
* संमती नोंदविणे म्हणजे पसंतीक्रम अर्ज भाग-२ वेळेत लॉक करणे होय.

डीटीपी आणि आतील सजावट : समृद्धी-९७३०१०६७५५

## D) Option form Part-2 (Preferences) :

17) After the filling of Part-1 then process to fill the Option form Part-2 will begin.

18) On verification of appplication Part-1 form, students can fill Part-2 (Preferences).

19) While filling Part-2 Std. 10th obtained marks of fresher students of state board will be fetched automatically. As per best of five rule.

20) The students whose marks are not fetched and other board's students have to fill their 10th marks manually but accurately.

21) For admission, **choose a stream and a medium** of instruction, apply filter, after that a list of Jr. College will be displayed. Then set your preferences.

22) For online admission, select minimum ONE and maximum TEN Jr. Colleges for admission (preferences). Then take print of the form and preserve it.
Students to apply for Quota also in Part-2.

23) Allotment list for the admission round is prepared on the basis of merit (SSC Marks), reservation and student's given preference order. So lodge your preferences carefully.

24) Updated schedule and various instructions regarding Online Admission process will be declared on portal from time to time. Therefore visit the portal frequently.

**CONSENT at every Round -**

* Each student will get a chance of giving or modifying his preferences before every round.
* It will be mandatory to lodge students consent on portal before every all round who fails to give consent online for that round will not be considered for the respective round.
* Consent is given by locking option form on Part-2 within the stipulated time.

# प्रवेश प्रक्रियेचा प्रवाह तक्ता

**(प्रवाह तक्ता- ३)**

**इ.१०वी ऑनलाईन**
**निकाल जाहीर**

↓

**प्रवेश अर्ज भाग-१ भरा**
आवश्यक कागदपत्रे अपलोड करा

राज्य मंडळाच्या विद्यार्थ्यांसाठी
↓
आपल्या प्रवेश अर्जातील माहिती बरोबर असल्याची खात्री करा व अर्ज लॉक करा.
↓
VERIFIED

संकेतस्थळावर दिलेली माहितीपुस्तिका डाऊनलोड करून वाचा व **ऑनलाईन नोंदणी करा**

अन्य मंडळांच्या विद्यार्थ्यांसाठी
↓
आपण भरलेली माहिती पुन्हा तपासून पाहा. अर्ज लॉक करा
↓
VERIFIED

ऑनलाईन अर्जाचा
**भाग- २ भरा**
CAP (पसंतीक्रम देणे) QUOTA

↓ (संमती नोंदवून सहभाग)

**शून्य फेरी**
**(नियमित फेरीची पूर्वतयारी)**

**(४ नियमित फेऱ्या)**
(केंद्रीय प्रवेश)
**प्रवेश फेरीची यादी जाहीर**

**विशेष फेऱ्या**
**(सर्वांसाठी खुल्या)**

पहिला पसंतीक्रम मिळाल्यास
↓
मिळालेल्या उच्च माध्यमिक विद्यालयात प्रवेश घ्या
↓
प्रवेश न घेतल्यास
पुढील सर्व नियमित फेऱ्यांसाठी प्रतिबंध

२ ते १० पैकी
पसंतीक्रम मिळाल्यास
↓
मिळालेल्या उच्च माध्यमिक विद्यालयात प्रवेश घ्या
↓
प्रवेश न घेतल्यास
पुढील फेरीमध्ये
संधी मिळेल

प्रवेशासाठी उच्च माध्यमिक विद्यालय मिळाले नसल्यास
↓
पुढील फेरीमध्ये
संधी मिळेल

*टीपा :* १. *नवीन विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर ऑनलाईन नोंदणी करून व अर्ज भाग-१ भरून प्रवेश प्रक्रियेत सहभागी होता येईल.*

२. *अर्जाचा भाग-२ भरण्यापूर्वी भाग-१ मधील माहिती भरून अर्ज तपासून लॉक करावा.*

३. *नियमित फेऱ्या संपल्यानंतर (ओपन टू ऑल) विशेष फेरीचे आयोजन केले जाईल.*


४. *प्रत्येक फेरीपूर्वी अर्जाचा भाग-२ मध्ये (पसंतीक्रम बदल) सुधारणा करता येतील. प्रत्येक प्रवेश फेरीत सहभागी होण्यासाठी ऑनलाईन संमती नोंदविणे (भाग-२ लॉक करणे) बंधनकारक राहील. भाग-२ मध्ये कोटा पसंतीही नोंदवू शकता.*

५. *एटीकेटी विद्यार्थ्यांना ओपन टू ऑल विशेष फेरी एकनंतर, इ. १०वी परवणी परीक्षा निकालानंतर प्रवेशाची संधी मिळेल.*

डीटीप आणि आतील सजावट : समृद्धी-९७३०१०६७५५

# Admission Process Flow Chart

**(Flow Chart-3)**




**NB :**
1. New Students can enter the Admission Process at any stage. Performing online registeration process and filling application form Part-1.
2. Before filling Option form Part-2 student has to fill Applicatin form Part-1, pay processing fee and get form verified.
3. After completion of 4th regular round open to all special round will be conducted.
4. Before every round student can update his/her preferences in option form Part-2. To participate in any round student must give online CONSENT. (i.e. Part-2 has to be locked again). Quota choices can also be give in Part-2
5. ATKT students will be allowed to fill form after special round-1/after the declaration of the result SSC supplementary examination.

डीटीप आणि आतील सजावट : समृद्धी-९७३०९०६७५५

# 4 विद्यार्थ्यांनी घ्यावयाच्या दक्षता

## (४.१) विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना

### * ऑनलाईन नोंदणी व अर्ज भरणे

(१) अर्जात भरलेल्या माहितीची व अर्जदारांच्या प्रमाणपत्रांची पडताळणी प्रवेशावेळी केली जाणार असल्याने विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज ऑनलाईन भरावा व पुन्हा एकदा स्वतः तपासून प्रमाणित करावा. (अर्ज केवळ विद्यार्थी लॉगीनमधूनच भरला जाणार आहे त्यामुळे आपला अर्ज भरताना दक्ष राहा.)

(२) **विद्यार्थ्यांनी ऑनलाईन प्रवेश अर्ज शक्यतो स्वत: पालकांच्या मदतीने भरावा. इतर ठिकाणाहून अर्ज भरल्यास त्यामध्ये अपूर्णता/त्रुटी राहू शकतील व त्यामुळे तुमच्या प्रवेश प्रक्रियेत अडथळा येऊ शकेल.**

(३) प्रवेश अर्ज सादर (Submit/Lock) केल्यानंतर त्याची एक छापील प्रत (Print out) विद्यार्थ्याने स्वत:कडे घेऊन ठेवावी. यावरून विद्यार्थ्यास अर्जात भरलेली माहिती पुन्हा पडताळून पाहता येईल.

(४) अधिक माहितीसाठी वेब पोर्टलवर देण्यात आलेल्या टोल फ्री हेल्पलाईन नंबरवर संपर्क साधावा. शंकांचे निरसन न झाल्यास आपल्या शाळेची अथवा मार्गदर्शन केंद्राची मदत घ्या किंवा आपली अडचण वेब पोर्टलवर विद्यार्थी लॉगीनमध्ये शंका-समाधानमध्ये नोंदवा.

(५) विद्यार्थ्यांनी पुस्तिकेत दिलेल्या माहितीचा व्यवस्थित अभ्यास करून आपणास हवे असलेल्या उच्च माध्यमिक विद्यालयाचे शाखेचे नाव/सांकेतांक (Code Numbers) प्रवेश अर्जात अचूक भरा. ऑनलाईन प्रवेश अर्ज भाग-१ व भाग-२ संपूर्ण भरून झाल्यावर Submit/Lock करण्यापूर्वी अर्जाची पुन्हा एकदा पडताळणी करा.

(६) एकापेक्षा अधिक प्रयत्नात इयत्ता १० वी किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण झालेल्या Repeater विद्यार्थ्यांनी त्यांचे प्रवेश अर्ज ऑनलाईन पद्धतीने भरताना त्यांच्या वेळोवेळी उत्तीर्ण झालेल्या विषयांच्या गुणांची बेरीज करून एकूण गुण अचूक नोंदवावेत. अनुत्तीर्ण असलेल्या विषयांचे गुण नोंदवू नयेत.

(७) प्रवेश अर्ज भाग-२ मध्ये योग्य पसंतीक्रम भरा, तेच-ते पसंतीक्रम न देता सर्व बाबींचा विचार करून योग्य पसंती नोंदवा. त्यामध्ये वेळोवेळी आवश्यक सुधारणा करता येईल. यामुळे तुम्हाला लवकर प्रवेश मिळण्यास मदत होईल.

**विद्यार्थ्यांसाठी माहिती मिळविण्याचे स्रोत-**

* वेब पोर्टलवर वेळोवेळी प्रदर्शित होणाऱ्या सूचना व परिपत्रक.
* माहिती पुस्तिका, कॉल सेंटर किंवा मार्गदर्शन केंद्र व शंका समाधान सुविधा
* अधिकृत व्हिडिओच्या माध्यमातून देण्यात आलेली माहिती.

**इशारा-** अफवा आणि बनावट बातम्यांपासून सावध/दूर राहा. आपले लॉगीन वेळोवेळी तपासत राहा.

डीटीपी आणि आतील सजावट : समृद्धी-९७३०१०६७५

# 4 Precautions to be taken by Students

## 4.1 Important instructions for Students

### * Online Registration and Application

1) As the information filled and uploaded documents, shall be verified at the time of admission, fill your form online and get your application form verified by checking yoursef again.
(The application form can be filled from students login only, so be careful)

2) **Application form may remain incomplete/wrong if filled at other place and hence you may have to face difficulties further. So students are advised to fill the form on their own with the help of your parents.**

3) After submission of online application form, take print out of the same and keep it for further reference.

4) For additional information or queries you can contact **toll free helpline**. If not satisfied contact your school or Guidance centre or you can register your query on the portal under Grievance Redressal.

5) Fill the admission form, only after thorough study of Information Booklet. Before pressing submit/lock button, check and confirm the info filled in Part-1 and Part-2 again.

6) Students who have passed SSC exam. in more than one attempt should enter total marks of subjects cleared from time to time and need not enter marks of failed subjects.

7) Kindly mention proper and suitable preferences in the option form Part-2. Update your preferences time to time. It will help you to avoid delay in your admission.

**Sources of Information**

* Instructions and circulars Published time to time on the portal.
* The Information Booklet, call centre, Guidance Centre and Grievance redressal
* The information being given through authorised videos.

**Caution :** Be aware of rumours and fake/false information transmitted. Check your login always.

***पसंतीक्रम ठरविण्यासाठी मार्गदर्शन सूचना :***

- *पसंतीक्रम निश्चित करताना त्या उच्च माध्यमिक विद्यालयाचे मागील कट ऑफ, आपणास मिळालेले गुण, हवी असलेली शाखा, शुल्क, माध्यम, अनुदान प्रकार, शिकविले जाणारे वैकल्पिक विषय, निवासापासूनचे अंतर, जाण्यायेण्याची सोय, वसतिगृह सुविधा, क्रीडांगण, इ. बाबींचा साकल्याने विचार करून पसंतीक्रम ठरवा.*
- ***विद्यार्थ्यास प्रवेशासाठी त्याच्या पसंतीनुसार किमान एक ते दहा उच्च माध्यमिक विद्यालयांचे पसंतीक्रम देता येतील. प्रथम पसंतीक्रमानुसार प्रवेश मिळाल्यास प्रवेश घेणे सक्तीचे असेल. (नियमित फेऱ्यांमध्ये)***
- *पसंतीक्रम ठरविण्यासाठी अगोदर शाखा व माध्यम निश्चित करा व त्यानंतर येणाऱ्या यादीतील आपणास योग्य वाटत असणाऱ्या उच्च माध्यमिक विद्यालयांची यादी करा व त्यामधील सर्वात योग्य पसंतीचे उच्च माध्यमिक विद्यालय प्रथम घेऊन त्याप्रमाणे क्रम काळजीपूर्वक ठरवा व नंतरच ऑनलाईन पसंतीक्रम नोंदवा.*
- ***ज्या विद्यालयात आपणास प्रवेश घ्यावयाचा नाही अशा उच्च माध्यमिक विद्यालयाचा पसंतीक्रमामध्ये समावेश करू नका.***
- *प्रत्येक फेरीला पसंतीक्रम बदलण्याची मुभा असल्यामुळे प्रत्येक फेरी स्वतंत्र असणार आहे. पसंतीक्रम ठरविताना मागील फेरीचे Cut-Off तपासा.*
- *प्रवेश इच्छुक उमेदवारांना प्रत्येक फेरीमध्ये सहभागी होण्यासाठी सहमती दर्शविणे अनिवार्य असेल सहमती दर्शविली नसल्यास त्या फेरीमध्ये प्रवेशाकरता त्या उमेदवाराचा विचार केला जाणार नाही.*
- *यासाठी वेब पोर्टलवरील* **Know your Eligibility** *या सुविधेचा वापर करा.*
- *सर्व दहा पसंतीक्रम भरलेच पाहिजेत असे नाही. तसे शक्य नसल्यास दहापेक्षा कमी पसंतीक्रम दिले तरी चालतील.*

(८) एकाच उच्च माध्यमिक विद्यालयातील शाखा, अनुदान प्रकार, माध्यम विचारात घेऊन त्याला स्वतंत्र सांकेतांक (Code) दिलेले आहेत. **त्यामुळे एकाच विद्यालयाला शाखा, अनुदान प्रकार, माध्यम यानुसार एकापेक्षा अधिक कोड असू शकतात** त्यामुळे विद्यालय/शाखा कोड निवडताना दक्षता घ्या.


## ४.२ उच्च माध्यमिक विद्यालय/तुकडी कोडची रचना :

विद्यालयाचा कोड नऊ अक्षरी (Characters) असून त्यात अक्षरे व अंक समाविष्ट आहेत.

उदा. : पुणे — विज्ञान अनुदानित इंग्रजी माध्यम - PN1023SGE

कला विनाअनुदानित उर्दू माध्यम - PN1023ANU

**उच्च माध्यमिक विद्यालयांना दिलेल्या कोडची रचना :**




| | |
|---|---|
| **१) क्षेत्रनिहाय दिलेले कोड :** | मुंबई (MU), पुणे (PN), नागपूर (NG), अमरावती (AM), नाशिक (NK), लातूर (LA), छत्रपती संभाजीनगर (AU), कोल्हापूर (KO) |
| **२) शाखानिहाय कोड :** | कला (A), विज्ञान (S), वाणिज्य (C) |
| **३) अनुदान प्रकारानुसार कोड :** | शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्था (O)<br>अनुदानित (G), विना अनुदानित (N), स्वयं:अर्थसहायित (F), अंशत: अनुदानित (P) |
| **४) माध्यमनिहाय कोड :** | १) मराठी (M), २) इंग्रजी (E), ३) उर्दू (U), ४) हिंदी (H), ५) गुजराती (G), ६) कन्नड (K), ७) सिंधी (S) |

**Guideline to decide preferences :**

* While deciding the preferences, consider all the aspects viz. cut-off, your marks, stream, fees, medium, aid type, distance from your residence, convenience, hostel facility, play ground etc.
* **Students can give minimum ONE to Ten TEN preferences. First preference is Mandatory for admission during regular rounds.**
* To prepare preference order, first decide a stream and a medium. Then prepare a convenient list of Jr. Colleges and give first preference to the best suitable Jr. College then fix next preference order accordingly.
* **Don't include such Jr. Colleges in your list, in which you are not interested .**
* Your preference order can be changed before every round as each round will be independent. To decide your preference order you can check Cut-off marks of earlier round.
* It will be mandatory for the candidates seeking admission to consent to participate in each round. If consent is not given, the candidate will not be considered for admission in that round.
* For this do avail the facility of **Know your Eligibility** provided on the portal.
* It is not mandatory to give, all ten preferences, you can give less too.

8) Different code numbers may be given to same Jr. college on the basis of types of Aid, stream and medium. Hence a Jr. College may have more than one code numbers to the streams. Therefore be careful while selecting stream code.


## 4.2 Code Structure of Jr. College/Stream Code)

Jr. College code number, consists of nine alpha-numeric characters.

e.g. Pune Science, Aided, English Medium - PN0123SGE

Arts, Unaided, Urdu Medium - PN1023ANU

**Code structure of Jr. College -**




1. **Areawise Code -** Mumbai (MU), Pune (PN), Nagpur (NG), Amravati (AM), Nashik (NK), Latur (LA), Chh. Sambhajinagar (AU), Kolhapur (KO)
2. **Streamwise Code -** Arts (A), Science (S), Commerce (C)
3. **On the basis of aid -** Government and Local Body (O)
   Aided (G), Unaided (N), Self finance (F), Partially Aided (P)
4. **Mediumwise Code -** 1) Marathi (M), 2) English (E), 3) Urdu (U), 4) Hindi (H), 5) Gujarati (G), 6) Kannad (K), 7) Sindhi (S).

## ४.३ नियमित फेऱ्यांसाठीचे नियम :

(९) प्रत्येक फेरीसाठी ऑनलाईन संमती नोंदविणे (भाग-२ पुन्हा लॉक करणे) सक्तीचे असेल.

(१०) प्रत्येक फेरीपूर्वी संमती नोंदविणे आवश्यक आहे.
प्रत्येक फेरीसाठी मागील पसंतीक्रम पुढे जसेच्या तसे आपोआप घेतले जाणार नाहीत.

(११) पहिला पसंतीक्रम दिलेल्या उच्च माध्यमिक विद्यालयात विद्यार्थ्यास प्रवेश मिळाला असल्यास सदर उच्च माध्यमिक विद्यालयात निर्धारित कालावधीत विद्यार्थ्याने प्रवेश घेणे बंधनकारक असेल.
पहिला पसंतीक्रम मिळालेल्या विद्यार्थ्यांची नावे त्यापुढील सर्व नियमित फेऱ्यांसाठी प्रतिबंधित (Restrict) करण्यात येतील. (प्रवेश घेतला नाही तरी).

(१२) पहिल्या पसंतीक्रमांकाव्यतिरिक्त अन्य पसंतीक्रमांकाचे (२ ते १०) उच्च माध्यमिक विद्यालय मिळाल्यास व ते विद्यार्थ्यास मान्य असल्यास असे विद्यार्थी निर्धारित कालावधीत सदर उच्च माध्यमिक विद्यालयात आपला प्रवेश निश्चित करू शकतील. निर्धारित कालावधीत प्रस्तुत विद्यार्थ्यांनी संबंधित विद्यालयात प्रवेश निश्चित न केल्यास त्यांना पुढील फेरीसाठी (पसंतीक्रम बदलण्याची) मुभा देण्यात येईल.

(१३) प्रत्येक फेरीपूर्वी उच्च माध्यमिक विद्यालयामधील रिक्त जागा घोषित करण्यात येतील. त्यांचे वेब पोर्टलवर अवलोकन करूनच पुढील फेरीसाठी पसंतीक्रम घ्यावेत.

### प्रवेश अर्ज मागे घेणे :

ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर आयटीआय (ITI), तंत्रनिकेतन (Polytechnic)सारख्या अभ्यासक्रमांना प्रवेश मिळालेल्या अथवा ह्या केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेश घेणार नसलेल्या विद्यार्थ्यांना अर्ज मागे घेण्याचा पर्याय उपलब्ध करून दिला जाईल. तरी ज्यांना ११वी प्रवेश प्रक्रियेमध्ये पुन्हा यायचे नाही त्यांनी Withdrawal of Application हा पर्याय वापरून प्रक्रियेमधून बाहेर पडावे. यामुळे इतरांना संधी मिळेल.

(१४) प्रवेशित विद्यार्थ्यांस प्रवेश प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर प्रवेश रद्द करता येईल. तथापि, **घेतलेला प्रवेश रद्द केल्यास पुढील नियमित फेरीसाठी प्रतिबंधित केले जाईल.** अशा विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेमध्ये पुन्हा सहभागी व्हावयाचे असल्यास भाग-२ पुन्हा भरून सर्वांसाठी खुला फेरीमध्ये सहभागी होता येईल.

(१५) प्रथम प्राधान्य क्रमांकाच्या उच्च माध्यमिक विद्यालयात प्रवेश मिळूनही त्या ठिकाणी विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित न केल्यास त्यांना विशेष फेरी सर्वांसाठी खुली पर्यंत प्रतिबंधित करण्यात येईल. अर्थात त्यांना उर्वरित नियमित फेऱ्यांमध्ये सहभागी होता येणार नाही. प्रथम प्राधान्यक्रमाचे उच्च माध्यमिक विद्यालय मिळालेल्या विद्यार्थ्यांनी प्रवेश घेऊन रद्द केला अथवा त्यांना प्रवेश ना करण्यात आला तरीही वरील प्रमाणे त्यांना प्रतिबंधित करण्यात येईल.

(१६) प्रथम पसंतीक्रम मिळूनही प्रवेश न घेतलेल्या अथवा विद्यालयाकडून प्रवेश नाकारण्यात आलेल्या अथवा प्रवेश रद्द केलेल्या विद्यार्थ्यांनाही पुढील सर्व नियमित फेऱ्यांसाठी प्रतिबंधित केले जाईल.

### नियमित फेऱ्यात प्रतिबंधित होण्याची ३ कारणे

१) पहिला पसंतीक्रम मिळूनही प्रवेश घेतला नाही तर.
२) विद्यार्थ्याने घेतलेला प्रवेश रद्द केल्यास.
३) संबंधित विद्यालयाने विद्यार्थ्यास प्रवेश नाकारल्यास. (अर्जातील चुकीच्या माहितीमुळे)

## 4.3 Rules for regular rounds :

9) To participate in every round online CONSENT is compulsory. (Lock Part-2 again)

**10) Earlier preferences will not be carried forward for every round.**
**Online Consent will be must for every round.**

11) When first preferred Jr. College is allotted to a student in any regular round then he/she has to secure admission in allotted Jr. College in given time.
Names of students got first preference will be restricted for further all regular rounds (whether admission TAKEN or NOT).

12) Students who have got other than their first preferred Jr. College (2-10) and if he/she accepts it, such students can finalise his/her admission in respective Jr. College during given period if such students did not secure their admission in allotted Jr. College can get chance (to update preferences) participate in next round again.

13) Before every round position of vacant seats (vacancy) will be declared on the portal. Students should check it and take decision accordingly.

**Withdrawal of Application :**

After submission of online admission form, If a student wants to go for some other course like ITI or Polytechnic can withdraw his/her application form. i.e. For those students who are not interested in this 11th admission and willing to go out of this process, the **'Withrawal of Application'** facility is provided to them. These students are requested to use this facility and withdraw their application form. It will increase opportunity to others.

14) Admission finalised in Jr. College can be cancelled at any stage. **Please note if you cancel your admission your application form will be restricted for regular round.** Such students can re-enter and participate in open to all rounds by locking Part-2 again.

15) If a student gets admission to the first priority jr college but do not confirm his admission there, they will be barred till the special round open to all. That is, they will not be able to participate in the remaining regular rounds. Even if students who get admission in the first priority jr college & cancel their admission or are not admitted, they will alao be barred as above.

16) Those students who have been allotted first preference but admission not taken and or admission been rejected by Jr. College or get their admission cancelled will also be restricted for further all regular rounds.

**3 Reasons of restriction (Regular rounds)**

1) Allotted first prefered and admission not taken.
2) If admission taken and cancelled by students.
3) If admission rejected by Jr. College for wrong information filled in the form.

# 5 प्रवेश फेरीची यादी जाहीर झाल्यावर

* प्रवेश फेरी यादी जाहीर झाल्यावर विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी मिळालेल्या उच्च माध्यमिक विद्यालयाची माहिती विद्यार्थी लॉगीनमध्ये दर्शविण्यात येईल. ती तपासून पाहावी व पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी.

## (अ) प्रथम प्राधान्यक्रम मिळाल्यास :

(५.१) विद्यार्थ्यास पहिला पसंतीक्रम दिलेल्या उच्च माध्यमिक विद्यालयात प्रवेश मिळाला असल्यास त्या उच्च माध्यमिक विद्यालयात आपली मूळ प्रमाणपत्रे व त्यांच्या छायांकित प्रती वेळापत्रकाप्रमाणे विहित मुदतीत दिलेल्या सूचनेनुसार सादर करून, विहित शुल्क भरून प्रवेश घेणे.

(५.२) पहिल्या पसंतीक्रमाचे उच्च माध्यमिक विद्यालय मिळूनही प्रवेश घेतला नाही, तर अशा विद्यार्थ्यांची नावे (संबंधित शाखेसाठी) पुढील सर्व नियमित फेऱ्यांसाठी (सर्वांसाठी खुला फेरीसाठी हे लागू नाही) प्रतिबंधित (Restrict) करण्यात येतील. मात्र अशा विद्यार्थ्यांना ऑनलाईन संमती नोंदवून विशेष फेऱ्यांमध्ये सहभागी होता येईल.

## (ब) अन्य (२ ते १० पैकी एक) प्राधान्यक्रम मिळाल्यास :

(५.३) पहिल्या पसंतीक्रमाव्यतिरिक्त अन्य पसंतीक्रमांकाचे उच्च माध्यमिक विद्यालय मिळाल्यास व ते विद्यार्थ्यास मान्य असल्यास असे विद्यार्थी निर्धारित कालावधीत सदर उच्च माध्यमिक विद्यालयात आपली मूळ प्रमाणपत्रे व त्यांच्या छायांकित प्रती सादर करून व विहित शुल्क भरून आपला प्रवेश निश्चित करू शकतील. उच्च माध्यमिक विद्यालयाने दिलेल्या सूचनांनुसार कार्यवाही करावी.

(५.४) अशा विद्यार्थ्यांनी निर्धारित कालावधीत संबंधित उच्च माध्यमिक विद्यालयात प्रवेश निश्चित न केल्यास त्यांना पुढील फेरीसाठी पसंतीक्रम बदलण्याची मुभा देण्यात येईल.

(५.५) प्रवेश मिळालेल्या उच्च माध्यमिक विद्यालयात प्रवेश घेण्यापूर्वी विद्यार्थ्यांच्या सर्व मूळ कागदपत्रांची व अर्जातील माहितीची उच्च माध्यमिक विद्यालयाकडून पडताळणी केली जाईल. तत्पूर्वी विद्यार्थ्याने अपलोड केलेली कागदपत्रे तपासून त्याचा प्रवेश उच्च माध्यमिक विद्यालय ऑनलाईन निश्चित करेल.

(५.६) अर्जदाराने प्रवेश घेतल्यानंतर त्याला संबंधित उच्च माध्यमिक विद्यालयाकडून संगणकीकृत प्रवेश पावती देण्यात येईल.

डीटीपी आणि आतील सजावट : समृद्धी-९७३०१०६७७५

# 5 After Declaration of Round Allotment List

* After declaration of admission round list, Applicant should check the information about The allotted Junior College in student's login and follow the following steps -

## A) If first preference is allotted :

5.1 Applicants to whom Junior College of first preference is allotted; one **must confirm his/her admission in that Junior College within stipulated time as per time-table** Submission of all relevant documents in original with photocopies & payment of fees is understood.

5.2 Students who are allotted his/her first preference and admission not taken, will be restricted/blocked for next all regular (Not applicable during special rounds) rounds (for selected stream), those students can participate in the special rounds by locking Part-2 again.

## B) If any one of the 2nd to 10th preference allotted :

5.3 Applicants who are allotted in a Junior College other than first preference and are interested in taking admission in the same, can confirm admission in the Junior College with all relevent documents in original with photocopies and on payment of fees or act as per instructions given by the Junior College.

5.4 Applicant who has not confirmed admission in the allotted Junior College within stipulated time will not be blocked for next rounds and if preferences not updated then the preference order of the last round will be carried forward too during regular rounds.

5.5 Please note that the candidate’s admission to the Junior College is subject to the verification of all documents by the admitting authority of the Junior College. Jr. College will check documents and fix the admission.

5.6 Upon securing admission in the allotted Junior college a system generated ‘Admission Receipt’ will be given by the respective Junior College.

## (क) प्रवेशासाठी कोणतेही उच्च माध्यमिक विद्यालय मिळाले नसल्यास :

५.७) प्रवेश फेरीमध्ये प्रवेशासाठी कोणतेही उच्च माध्यमिक विद्यालय मिळाले नसल्यास अशा विद्यार्थ्यांचा समावेश पुढील लगतच्या फेरीमध्ये करण्यात येईल.

५.८) दिलेल्या पसंतीक्रमातील उच्च माध्यमिक विद्यालय प्रवेशासाठी न मिळालेल्या विद्यार्थ्यांनी नाउमेद न होता आपल्या पसंतीच्या उच्च माध्यमिक विद्यालयाचे कट-ऑफ पुन:श्च तपासून पसंतीक्रमांची पुनर्रचना करावी व पुढील फेरीसाठी अर्ज भाग-२ पुन्हा भरावा.

५.९) शेवटच्या विद्यार्थ्याच्या प्रवेशापर्यंत ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरू राहील.

* ऑनलाईन पडताळणीमध्ये कोणतेही प्रमाणपत्र/दाखला अथवा विद्यार्थ्याचा दावा (उदा. संविधानिक/विशेष आरक्षण इत्यादी) अयोग्य/गैरलागू आढळल्यास सदर उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये विद्यार्थ्याला प्रवेश नाकारला जाऊ शकतो.

* मूळ कागदपत्रांच्या पडताळणीमध्ये व यापूर्वी ऑनलाईन सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये तफावत आढळल्यास अशा विद्यार्थ्यांचा प्रवेश रद्द केला जाईल. याची नोंद घ्यावी.

* प्रवेशासाठी मिळालेल्या उच्च माध्यमिक विद्यालयात जाण्यापूर्वी त्यांच्याशी दूरध्वनी, मेलद्वारे संपर्क साधा. विद्यालयाने दिलेल्या सूचनेनुसार ऑनलाईनच प्रवेश निश्चित करावा. आणि विद्यालय प्रत्यक्ष प्रवेशाच्या वेळी सर्व मूळ कागदपत्रांसह जाऊन प्रवेश अंतिम करावा.

* विद्यार्थ्याने ऑनलाइन प्रवेश अर्जातील मजकूर व प्रत्यक्षात प्रवेशाच्या वेळी सादर केलेली कागदपत्रे व माहितीमध्ये तफावत आढळल्यास त्यास विशेष फेरीपर्यंत प्रवेश प्रक्रियेपासून वंचित ठेवण्यात येईल. परंतु सर्वांसाठी खुल्या विशेष फेरीमध्ये प्रवेश घेण्यास संबंधित विद्यार्थी पात्र असेल. तथापि इयत्ता दहावीच्या गुणपत्रकामध्ये फेरफार असल्यास पुढील कोणत्याही फेरीसाठी विद्यार्थी पात्र असणार नाही.

* विहित मुदतीत प्रत्येक फेरीची कार्यवाही पूर्ण न केल्यामुळे प्रविश न मिळाल्यास शाळा व्यवस्थापन व विभाग जबाबदार असणार नाही. विद्यार्थ्यास प्रत्येक बाब पोर्टलवर वेळोवेळी सूचित केल्यानुसार मुदतीतच पूर्ण करणे आवश्यक आहे.

डीटीपी आणि आतील सजावट : समृद्धी-९७३०९०६७५५

## C) If no Junior College is allotted :

5.7 If no higher secondary school/junior college is allotted in the admission round, such applicants will be considered for next round.

5.8 Such applicants should not get disheartened. They can review cut-offs of Junior college of their choice again and rearrange preferences and submit option form (Part-2) for the next round.

5.9 Online admission process will continue till the last student get admission.

* If any document or any claim by the student found not valid at any stage, his/her claim of admission shall be denied.

* All the students should solemnly note that, if any discrepancy found in online uploaded documents and original documents those admissions shall be cancelled.

* After allotment, first call to the allotted Jr. College and fix your admission online. According to instructions given by the Jr. College.

  Present original documents to the Jr. Colleges and confirm your admission.

* If a student finds any discrepancy between the information and documents submitted by him/her in the online admission form and the information submitted at the time of admission, he/she will be disqualified from the admission process till the special round, but the student will only be eligible for admission in the special open to all round. However, if there is any change in the grade 10 mark sheet, the student will not be eligible for any subsequent round.

* The school management and the department will not be responsible for failure to complete each round of procedures within the prescribed time limit if admission is not granted. The student is required to complete each item within the deadline as notified on the portal from time to time.

## (ड) प्रवेश कसा घ्यावा :

५.१०) प्रवेशफेरीमध्ये प्रवेशासाठी उच्च माध्यमिक विद्यालय मिळाले आहे किंवा कसे हे स्टुडंट लॉगीनमध्ये तपासा व तेथे प्रवेश घ्यावयाचा असल्यास **PROCEED FOR ADMISSION** क्लिक करा व दिलेल्या वेळेत विद्यालयात प्रवेश निश्चित करा.

प्रवेशासाठी उच्च माध्यमिक विद्यालय निश्चित झाल्यानंतर **PROCEED FOR ADMISSION** करताना प्रवेशासाठी आवश्यक असणारी उर्वरित सर्व प्रमाणपत्रे अपलोड करावीत. विद्यार्थ्यांनी अपलोड केलेली प्रमाणपत्रे संबंधित उच्च माध्यमिक विद्यालयाकडून ऑनलाईन तपासली जातील व त्यावरून प्रवेश निश्चित करण्याची कार्यवाही केली जाईल.

५.११) प्रवेश घेण्यासाठी मिळालेल्या विद्यालयात प्रवेशासाठी जाण्यापूर्वी विद्यालयाशी संपर्क साधा व त्यांनी दिलेल्या सूचनांनुसार, वेळेनुसार कार्यपद्धती समजून घेऊन कार्यवाही करा.

**तुमचा प्रवेश ऑनलाईनच निश्चित केला जाईल. तशी सद्य:स्थिती विद्यार्थी लॉगीनमध्ये दर्शविण्यात येईल.**

प्रवेश घेण्यास जाण्यापूर्वी विद्यार्थी लॉगीनमध्ये **'PROCEED FOR ADMISSION'** बटण दाबा. (प्रवेश घ्यावयाचा असेल तरच.) व प्रवेशासाठी मिळालेल्या उच्च माध्यमिक विद्यालयाशी संपर्क साधा. प्रवेश घ्यावयाचा नसल्यास ही कृती करण्याची आवश्यकता नाही. तत्पूर्वी आपण सर्व कागदपत्रे अपलोड केली असल्याची खात्री करावी.



डीटीप आणि आतील सजावट : समृद्धी-९७३०१०६७५५

## (D) How to confirm an Admission :

5.10) During any admission round, go to your student login and check which Jr. College you have got for admission. If you agree with it **PROCEED FOR ADMISSION** and fix your admission in the respective Jr. College within stipulated time.

If your decision is final regarding taking admission in the alloted Jr. College only then **PROCEED FOR ADMISSION.** Simultaneously you have to upload all the required documents which are not uploaded before. The respective Jr. College will check the uploaded certificates and do needful to fix your admission.

5.11) Before going for the admission in the allotted Jr. College, contact them and follow the instructions given by them. Do understand the procedure and timely follow their instructions.

Your admission will be confirmed online by the Jr. College. The status will be shown in student login.

> If you want to confirm your admission in the allotted Jr. College- click on **'PROCEED FOR ADMISSION'** in the student Login and go for admission. And if your are not willing to take admission - Don't click on 'Proceed for admission'. Before that check if all documents are uploaded.

डीटीप आणि आतील सजावट : समृद्धी-९७३०९०६७५५

# Check List for Jr. Colleges and Students

## Activities to be done

| Activities for Jr. Colleges | Milestones | Activities for Students |
|---|---|---|
| | **SSC Result** | |
| College registration<br>Preparation for actual (online) admission | **BEFORE AND BEGINNING** | **Get essential documents with you**<br>Student Registration<br>Application Form verification (Part-1)<br>Upload documents and pay registration fee |
| Zero round<br>Quota Admissions<br>(Prepare merit list of quota applicants) | **ZERO ROUND** | **Know your eligibility**<br>Check and verify result details<br>Option form filling (Part-1 & Part-2)<br>Apply for quota seats and admission |
| **Four regular rounds**<br>Online admission formalities (CAP and QUOTA) | **REGULAR ROUNDS** | **Give Consent online**<br>Option form filling (Part-1 & Part-2)<br>Allotment (Centralise) (Remaining Upload)<br>Proceed for admission |
| **Open to all rounds**<br>Online admission formalities (CAP and QUOTA) | **SPECIAL ROUNDS (Open to all)** | **Give Consent online**<br>Option form filling (Part-1 & Part-2)<br>Allotment (Centralise) (Remaining Upload)<br>Proceed for admission |
| **Open to all rounds** | **SPECIAL ROUND for ATKT** | Activity after the declaration of SSC supplimentary examination results |

* उच्च माध्यमिक शाळा यांनी करावयाची पूर्वतयारी व विद्यार्थ्यांनी कोणत्या टप्प्यावर कोणती कामे करावयाची आहेत यासाठी वरील मार्गदर्शक अपणास मदत करेल.

डीटीप आणि आतील सजावट : समृद्धी-९७३०९०६७५५

# प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे

## Required Documents for 11th admission

| Required Documents | Applicable to (Category) |
|---|---|
| 1) **SSC Mark sheet or equivalant** | **All** |
| 2) **SSC Leaving Certificate** | **All** |
| 3) Caste Certificate | SC, ST, VJ/NT, OBC, SBC/SEBC |
| 4) EWS eligibility certificate | EWS |
| 5) Non Creamy Layer Cerfiticate | VJ/NT, OBC, SBC, SEBC |
| 6) Disability Certificate of Civil Surgeon | Divyang/Disabled |
| 7) Collectors certificate | Project affected/ Earthquake affected |
| 8) Parents Transfer order and Joining report | Wards of Transferred Employees |
| 9) Service Certificate or District Sainik Board Certificate | Wards of Defence Servicemen and Ex. Servicemen |
| 10) Collector's Certificate | Nomenees of Freedom Fighters |
| 11) Certificate issued by district sports officer | Student Sports person |
| 12) Certificate issued by women and family welfare department | Orphan applicants |

**वरीलपैकी फक्त आपणास लागू असलेली कागदपत्रे/प्रमाणपत्रे तयार ठेवा.**

**Pick the documents out of above which you need only.**

डीटीप आणि आतील सजावट : समृद्धी-९७३०९०६७५५

# 6 प्रवेशासाठी पात्रता आणि आवश्यक कागदपत्रे

## अ) इ. ११वी मध्ये प्रवेशासाठी आवश्यक पात्रता :

(६.१) राज्यमंडळाच्या इयत्ता ११ वी मध्ये प्रवेशासाठी इयत्ता १० वी किंवा समकक्ष परीक्षा **इंग्रजी विषयासह किमान पाच विषय घेऊन** उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

(६.२) **इ.११वी मध्ये विज्ञान शाखा निवडता येण्यासाठी** विद्यार्थी ज्या मंडळामार्फत इ.१०वी उत्तीर्ण झाला असेल त्या मंडळाच्या निकषानुसार तो **विज्ञान विषयात उत्तीर्ण** असणे आवश्यक आहे.

(६.३) **इ.११वी मध्ये गणित विषय निवडता येण्यासाठी** - इ.१०वी मध्ये विद्यार्थ्याने **सामान्य गणित** विषय निवडला असेल असे विद्यार्थी (कला, विज्ञान, वाणिज्य) कोणत्याही शाखेसाठी अर्ज करू शकतात. तथापि, **त्यांना गणित विषय घेता येणार नाही.**

(६.४) **इ.११वी मध्ये द्विलक्षी विषय निवडता येण्यासाठी** - इ.११वी मध्ये भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, गणित हे तीन विषय घेतलेले नसताना **तांत्रिक गटातील द्विलक्षी** अभ्यासक्रमास प्रवेश संबंधित मंडळाच्या मान्यतेनुसार देता येतील आणि इ.११वीमध्ये भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र व जीवशास्त्र हे तीन विषय घेतलेले नसताना **पॅरामेडिकल गटातील द्विलक्षी** अभ्यासक्रमास प्रवेश देता येत नाही.

टीप : वरील बाबींचा विचार करून पात्र असलेल्या शाखा व विषयांचीच निवड करावी अन्यथा प्रवेश नाकारला जाईल याची नोंद घ्यावी.

जे विद्यार्थी महाराष्ट्र राज्यमंडळाच्या इयत्ता १०वी परीक्षेत सर्व विषय घेऊन बसलेले आहेत व जास्तीत जास्त दोन विषयांत अनुत्तीर्ण झालेले आहेत, असे विद्यार्थी (ATKT) सवलतीद्वारे इ.११वीमध्ये प्रवेश मिळण्यासाठी पात्र असतील. अशा विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेच्या शेवटच्या टप्प्यात (इ. १०वी पुरवणी परीक्षा निकालानंतर) संधी मिळेल.

**अन्य मंडळाच्या विद्यार्थ्यांना एटीकेटी सवलत लागू नाही.** (ATKT च्या नियमानुसार)

## ब) प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे -

६.५ इ. ११वी मध्ये प्रवेश घेण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याने पुढील प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहेत. पुढील दोन कागदपत्रे ही इ.११वी मध्ये प्रवेश घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांसाठी बंधनकारक आहेत. त्यामध्ये खुल्या प्रवर्गातील तसेच विविध आरक्षणाच्या लाभ घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा समावेश होतो.

१) इ.१०वी / समकक्ष परीक्षेचे मूळ गुणपत्रक

२) इ.१०वी शाळा सोडल्याचा दाखला (मूळ प्रत)

६.६ **वरील दोन प्रमाणपत्रांशिवाय विविध आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना इतर काही कागदपत्रे सादर करावी लागतील. त्याचा सविस्तर तपशील या पुस्तिकेत पुढील पृष्ठांवर देण्यात आलेला आहे.**

डीटीपी आणि आतील सजावट : समृद्धी-९७३०९०६७५५

# 6 Essential Qualification and Required Documents

## A) Necessary qualification for std. XI Admission :

6.1 For admission in the Std.11th (State Board), the student should have passed Std.10th or equivalent examination with **English as a subject** and with minimum five subjects.

6.2 **For admission to Science stream**, the students should have **passed Science subject** at Std. 10th level as per the rules of the concerned education board.

6.3 **Eligibilty for Maths. Subject at 11th Standard -** Students passing Std. 10th with **General Mathematics** subject can apply for (Arts, Commerce, Science) any stream, but they **cannot opt for mathematics at Std. 11.**

6.4 **Eligibilty for Bifocal Courses -** The students who have taken Physics, Chemistry, Maths. Subject combinations are as per concern board rules to opt for **Bifocal subjects of Paramedical group** and the students who have taken Physics, Chemistry, Biology Subject combination are not eligible to opt for **Bifocal subjects of Technical group**.

**NB :** Students are advised to consider all above points for admission to any stream or subjects available to avoid the deprivation of admission.

> The students who have appeared 10th exam with all subjects and failed in not more than 2 subjects can avail ATKT facility. Through this facility he/she can admit in class 11th Standard. ATKT students will get chance at the end of this Admission process. (Probably after declaration of the SSC supplementary exam result)
>
> **Other board's students are NOT eligible for ATKT.**

## B) Essential Documents for Admission :

6.5 Following documents/certificates are required for admission to 11th Standard. following two documents are compulsory for all students seeking admission to 11th Std. As these documents are basic (General as well as category).

**1) Original Mark Sheet (10th or equivalent exam)**
**2) Std. 10th School Leaving Certificate (Original)**

**6.6 The students who are willing to take admission through any reserved seat, should submit additional documents along with above mentioned two. The details of required documents are given on the next pages of this booklet.**

**(६.७) सामाजिक प्रवर्गातून वैधानिक आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी :**

१) अर्जदार संविधानिक आरक्षणांतर्गत राखीव जागेसाठी अर्ज करीत असेल तर अर्जदाराने मागासवर्गीय असल्याबद्दल महाराष्ट्रातील सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले **जात प्रमाणपत्र** अपलोड करावे.

२) संविधानिक आरक्षणाचा लाभ महाराष्ट्राबाहेरील इतर राज्याचे मागासवर्गीय जात प्रमाणपत्रधारक विद्यार्थ्यांना मिळणार नाही.

३) **विजा, भज, इमाव, विमाप्र, सामाजिक व शैक्षणिक मागास** या प्रवर्गांसाठी जात प्रमाणपत्रासोबतच **उन्नत व प्रगत** गटात मोडत नसले बाबतचे प्रमाणपत्र सादर करावे.

४) **आर्थिक दुर्बल** घटकांसाठी EWS **पात्रता प्रमाणपत्र** सादर करावे लागेल.
(सर्व प्रमाणपत्रे संबंधित सक्षम प्राधिकारी यांनी दिलेली असावीत.)

५) जर एखादे प्रमाणपत्र आपणास मिळत नसेल आणि भविष्यातही मिळण्याची शक्यता नसेल तर अशा उमेदवारांसाठी खुल्या प्रवर्गातून अर्ज भरण्याचा पर्याय उपलब्ध आहे.

**प्रमाणपत्रे अपलोड करणे -**

**अर्ज भरताना वेब पोर्टलवर दर्शविल्याप्रमाणे आवश्यक कागदपत्रे अपलोड करावीत आणि मूळ प्रमाणपत्रे दिलेल्या मुदतीत सादर करावीत. अन्यथा अशा अर्जाचा समावेश खुला प्रवर्गात होईल अथवा त्या विद्यार्थ्यास दिलेला प्रवेश रद्द करण्यात येईल. आवश्यक कागदपत्रे अपलोड करणे, तसेच मूळ कागदपत्रे सादर करणे बाबत. वेळोवेळी वेब पोर्टलवर सूचना दिल्या जातील. मूळ गुणपत्रक व शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे अनिवार्य असेल.**

आवश्यक प्रमाणपत्रे अर्ज (भाग-१) भरताना अपलोड करा. उर्वरित प्रमाणपत्रे अपलोड करण्यासाठी आणखी एक संधी अलॉटमेंटनंतर प्रवेशापूर्वी मिळेल. प्रवेशासाठी विद्यालयास मूळ प्रमाणपत्रे सादर करणे अनिवार्य असेल.

**(६.८) विशेष/समांतर आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी**

ऑनलाईन अर्ज सादर करताना आवश्यक कागदपत्रे पडताळणीसाठी अपलोड करणे **आवश्यक** राहील. अन्यथा समांतर आरक्षणाचा लाभ घेता येणार नाही.

(१) **दिव्यांग (अपंग) :** जिल्हा शल्य चिकित्सक/अधिष्ठाता यांचे ४० टक्क्यांपेक्षा जास्त अपंगत्व असल्याबाबतचे प्रमाणपत्र तसेच **अध्ययन अक्षम** असलेल्या विद्यार्थ्यांनी सक्षम प्राधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

(२) **प्रकल्पग्रस्त / भूकंपग्रस्त :** संबंधित जिल्हाधिकारी किंवा त्यांच्या वतीने संबंधित जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांनी दिलेल्या विहित नमुन्यातील दाखल्याच्या आधारे प्रकल्पग्रस्त व्यक्तीला अथवा प्रकल्पग्रस्त व्यक्तीच्या कुटुंबातील तिच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तीला प्रवेश सवलतीच्या संदर्भात द्यावयाच्या दाखल्याचे प्रमाणपत्र आणि भूकंपग्रस्त असलेबाबत सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

(३) **बदलीने आलेल्या राज्यशासन/केंद्रसरकार/खाजगी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांचे पाल्य :** या आरक्षणांतर्गत प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांची बदली मागील वर्षी १ ऑक्टोबर, नंतर (त्या वर्षाची इ. ११वी प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर) झालेली असावी. याबाबत कर्मचाऱ्याचे बदली आदेश व बदलीच्या ठिकाणी रूजू झाल्याचा अहवाल प्रवेशाच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

6.7 **For Applicants Claiming Social/Constitutional Reservation :**

1) **If a student claims for Reserved Category seats** he/she should produce appropriate **Caste Certificate** issued by the competent authority of Maharashtra State.

2) The benefits of Constitutional/Social Reservation are not available for those who have certificates issued in other than Maharashtra States.

3) For **VJ/NT, OBC, SBC, SEBC** categories, additional **Non Creamy Layer** certificate is required along with Caste Certificate.

4) For **EWS category** EWS **Eligibity Certificate** required.

(All certificates should be issued by the competent authority/officer.)

5) If you are unable to get and will also be unable to get any certificate, submission of application form through General Category is open to all.

Upload and submit documents -

Kindly upload the required documents as displayed on the portal while filling application form and submit original copies of these documents in given time. Otherwise your claim on that reservation will be cancelled or your admission shall also be cancelled. Regarding upload and submission of required documents, instructions will be given time to time on the portal. Original leaving certificate and marksheet submission mandatory at the time of addmission.

**Kindly upload the available Certificates** while filling application form Part-1. One more chance will be given to upload at allotment stage before admission. Original documents must be tendered to the Jr. College at admission.

6.8 **For applicants Claiming Special/Parallel Reservation :** While applying online, the applicants must upload the required documents verification at the school/guidance centre. Otherwise the applicant may not avail the benefits of parallel reservation.

1) **Divyang/Disabled** : Certificate issued by the Civil Surgeon or the Dean of any Government hospital, showing at least 40% disability must be produced. Students with learning disability must produce a certificate issued by the competent authority.

2) **Project/Earthquake Affected :** Certificate issued by Collector/District Rehabilitation officer stating that project affected or earthquake affected or dependent need to be attached/to avail reservation under this catogory.

3) **Wards of the Employees of State Government/Central Government/Private Sector coming on transfer in the online admission area** - Original Certificate showing transfer of the employee on or after 1st October of last year need to be submitted while taking admission. Also required transfer order and joining order at new place.

(४) आजी/माजी सैनिकांच्या पत्नी / पाल्य :

(१) आजी सैनिक : सेवेत/सैनिक असल्याचा दाखला.

(२) माजी सैनिक : जिल्हा सैनिक बोर्डाचे प्रमाणपत्र/सेवामुक्ती दाखला.

(५) स्वातंत्र्यसैनिकांचे पाल्य : स्वातंत्र्यसैनिकांचे पाल्य म्हणजे स्वातंत्र्यसैनिकांवर अवलंबून असलेल्या व स्वातंत्र्यसैनिकांनी नामनिर्देशित केलेल्या व्यक्तीचे पाल्य. स्वातंत्र्यसैनिकांचे पाल्य म्हणून इ. ११वी प्रवेशासाठी आरक्षणाचा लाभ घेताना संबंधित जिल्हाधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र आवश्यक राहील.

(६) आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय खेळाडू विद्यार्थी : खेळाडू विद्यार्थ्यांना राखीव जागांवर प्रवेश देत असताना त्याचा प्राधान्यक्रम

i) आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमधील पदकविजेते खेळाडू

ii) आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये सहभागी खेळाडू व त्यानंतर

iii) राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमधील पदकविजेते खेळाडू असा राहील.

या आरक्षणांतर्गत इ.११वी प्रवेशासाठी संबंधित स्पर्धा विजेतेपदाचे प्रमाणपत्र अथवा सहभागाचे प्रमाणपत्र जिल्हा क्रीडा अधिकारी किंवा विभागीय क्रीडा उपसंचालक यांच्याकडून प्रमाणित करून घेणे आवश्यक आहे.

(७) अनाथ मुले - या आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या अनाथ विद्यार्थ्यांनी विभागीय उपायुक्त महिला व बालविकास विभाग यांचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

(शासन निर्णय २-४-२०१८)

---

(६.९) परदेशातून येणाऱ्या विद्यार्थ्यांनी संबंधित देशातील भारतीय दूतावासाची सही व शिक्का असलेले दाखला व गुणपत्रक सादर करावे. दाखला व गुणपत्रक इंग्रजी भाषेतील असावे. परदेशी रहिवासी असणाऱ्या विद्यार्थ्यांना कोणत्याही सामाजिक/वैधानिक आरक्षणाचा लाभ घेता येणार नाही.

(आपणास सर्व कार्यवाही ऑनलाईन करता येईल असा आमचा प्रयत्न आहे.

4) **Wife or Wards of Serviceman and Ex-Serviceman :**

i) For Serviceman: Defence Service Certificate.

ii) For Ex-Serviceman: Discharge Certificate or Certificate issued by District Sainik Board.

5) **Wards of Freedom Fighters :** Applicants who are dependent on the freedom fighters and are so nominated by the freedom fighters, must submit a certificate issued by the District Collector to that effect.

6) **International and national player students :** While admitting the player students against this reservation, the preference will be given to

i) Student who has won medal at Internationa level.

ii) Student who has participated at International level.

iii) Student who has won medal at National level.

For std. XI admission, under above reservation, the certificates of concerned competition (being winner or participant) should be authenticated by District Sports Officer or Regional Director of Sports.

7) **Orphan children :** Those applicants claiming the reservation of being orphan children should obtain a authentication certificate issued by the Divisional Deputy Commissioner of woman and child development. (GR Dated 2-4-2018)

---

6.9 **Foreigner student** need to have signature and due stamp of the Indian Consulate/Embassy on their School L.C. and marksheet. Marksheet must be in English language. Foreigners and NRI's are not eligible for any social reservation in Maharashtra.

**(We try to reduce your perspiration and make the system more easy.)**

# 7 अन्य मंडळांच्या विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक सूचना

(७.१) अन्य मंडळे म्हणजे महाराष्ट्र राज्यमंडळाव्यतिरिक्त इतर शिक्षण मंडळे जसे-सीबीएसई (CBSE), सीआयएसीई (CISCE/ICSE), सीएआयई/आयजीसीएसई (CAIE/IGCSE), आयबी (IB), एनआयओएस (NIOS) तसेच महाराष्ट्राव्यतिरिक्त अन्य राज्यांची (अथवा भारताबाहेरील) मंडळे इत्यादी.

७.२) महाराष्ट्र राज्यमंडळाव्यतिरिक्त अन्य मंडळाच्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रवेश क्षेत्रातील राज्यमंडळ संलग्न उच्च माध्यमिक विद्यालयांमध्ये प्रवेश घेण्यासाठी या पुस्तिकेत दिलेल्या कार्यपद्धतीप्रमाणे केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेत सहभागी होणे आवश्यक आहे.

७.३) अन्य मंडळाच्या विद्यार्थ्यांची माहिती (data) प्राप्त नसल्याने ती बैठक क्रमांक टाकल्यावर आपोआप येणार नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांनी सर्व माहिती स्वत: (manually) काळजीपूर्वक भरावी.

७.४) अन्य मंडळाच्या विद्यार्थ्यांनी आपला अर्ज वेब पोर्टलवर स्वत: भरावा. अर्जातील माहिती भरताना अचूक व सत्य भरणे अनिवार्य आहे. यासाठी मार्गदर्शन केंद्राची मदत घ्यावी.

७.५) सीबीएसई, आयसीएसई व आयजीसीएसई मंडळाच्या इ.१०वी गुणपत्रिकेतील गुणांचे रूपांतर करण्यासाठी वेब पोर्टलवर ऑनलाईन सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. इतरांनी गुणपत्रिकेवर दिलेल्या सूचनेनुसार आपण स्वत: गुण रूपांतर करावे व एकूण गुण संकेस्थळावर नमूद करावेत. रूपांतर करून आपण नमूद केलेल्या गुणांची पडताळणी केली जाणार आहे.

७.६) ज्या मंडळाच्या गुणपत्रिकेवर केवळ श्रेणी नमूद आहेत अशा विद्यार्थी/पालकांनी स्वत: रूपांतरित केलेले गुण विद्यार्थ्याच्या माध्यमिक शाळेने अथवा एखाद्या अधिकृत मार्गदर्शन केंद्राने प्रमाणित केलेले असावे.

७.७) अन्य मंडळांच्या विद्यार्थ्यांना मूळ गुणपत्रिका मिळाली नसल्यास ऑनलाईन मार्कशीटच्या आधारे (शाळेने प्रमाणित केलेले किंवा डिजी लॉकरमध्ये उपलब्ध असलेले) प्रवेश प्रक्रियेत सहभागी होता येईल. तथापि, प्रवेश कायम करताना उच्च माध्यमिक विद्यालयात गुणपत्रिकेची मूळ प्रत सादर करावी लागेल. सादर केलेली गुणपत्रिका तीच असल्याची खातरजमा करणे अनिवार्य असेल.

**११वी अनुत्तीर्ण अथवा अन्य अभ्यासक्रमाकडून येणारे विद्यार्थी**

इ. ११वी मध्ये अनुत्तीर्ण अथवा इतर अभ्यासक्रम (उदा. आय.टी.आय./तंत्रनिकेतन इ.) कडून येणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी हीच कार्यपद्धती असेल. तद्वत अशा विद्यार्थ्यांना त्यांचे इ.१०च्या गुणांच्या आधारे इ.११वीमध्ये प्रवेश घेता येईल.

७.८) अन्य मंडळाच्या विद्यार्थ्यांना प्रवेशावेळी स्थलांतर प्रमाणपत्र सादर करावेत.

७.९) अनधिकृत शिक्षण मंडळाच्या विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाणार नाही. भारतामधील मान्यताप्राप्त शिक्षण मंडळाची नावे वेब पोर्टलवर प्रसिद्ध करण्यात येतील.

# 7 Guidelines For Other Board's Students

7.1 **Other Boards :** Means the Education Boards other than the Maharashtra State Board viz.- CBSE, CISCE/ICSE, CAIE/IGCSE, IB, NIOS and Boards of other States or other countries.

7.2 Students of other boards (Other than Maharashtra State Board) who opt for admission in a Junior Colleges affiliated to Maharashtra State Board within any online admission area should fill online form and participate in this admission process only.

7.3 After entering the 10th examination seat number, the other board student's information will not get filled automatically as data of such students is not available. These students have to fill-in their personal information by themselves carefully.

7.4 Other Board's students should fill their form on the portal by self. The information fill in the form should be correct and factual. For that an assistance can be taken from the nearest Guidance Centre.

7.5 If applicants result of Std. X is in Grade form, students have to get the grades converted into marks. Conversion facility for CBSE, ICSE and IGCSE is provided on the portal itself. Others should make the conversion yourself as per the criteria of Board given on your marksheet. After that mention the total of marks in the form. This will be verified at form verification again.

7.6 Manual conversion is required to be verified by the Secondary School or any authorised guidance centre. Wherever only grades are there in the marksheet.

7.7 Other board's students can participate in this admission process with their provisional marksheet. However they need to submit original copy of marksheet while comfirming their admission in the respective Junior College. The Junior College will tally and verify into with original marksheet.

**For Std 11th failed and students coming from other educational courses :**

Students failed in Std XI or coming from ITI/Polytechnic or from any other course can apply for the admission to Std XI through this online process as per rules.

7.8 For other boards students required to submit migration certificate at the time of admission.

**7.9 Students passed from any of the unauthorised/unrecongnised board is not eligible for admission. List of recognised education board may be displayed on the portal.**

# 8 इतर महत्त्वाचे घटक

## अ) पालकांसाठी सूचना :

१) आपल्या पाल्यावर कोणताही दबाव टाकू नका, त्याऐवजी त्यांचे समुपदेशन करा व त्यांना भविष्यातील जीवनाचा (career) शिक्षणमार्ग निवडण्यास मदत करा.

२) आपल्या पाल्यामध्ये कोणत्या क्षमता आहेत, तो काय करू शकतो याची खरी जाण आपल्याशिवाय इतर कोणास असणार? त्यामुळे त्यांचे मित्र बना व त्यांना निर्णय घेण्यास मदत करा.

३) ही प्रवेश प्रक्रिया आपणही समजावून घ्या व भांबावून / गोंधळून न जाता योग्य वेळी योग्य निर्णय घ्या. यासाठी हेल्पलाईन अथवा नजिकचे मार्गदर्शन केंद्र यांचे (दूरध्वनीवरून) सहाय्य घ्या.

४) वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सूचना जाणून घेण्यासाठी वेब पोर्टलला नियमित भेट द्या.

५) ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेची माहितीपुस्तिका पाहण्याची सोय वेब पोर्टलवर केलेली आहे. ऑनलाईन अर्ज भरा, प्रवेश प्रक्रिया शुल्क जमा करा व अर्जात भरलेली माहिती पुनः पुन्हा तपासून घ्या.

६) जर एखादे प्रमाणपत्र आपणास मिळत नसेल आणि भविष्यातही मिळण्याची शक्यता नसेल तर अशा उमेदवारांसाठी खुल्या प्रवर्गातून अर्ज भरण्याचा पर्याय उपलब्ध आहे.

७) आवश्यकतेनुसार वेळोवेळी शाळा अथवा मार्गदर्शन केंद्र यांची मदत घ्या.

८) प्रत्येक प्रवेश फेरीपूर्वी अर्जाचा भाग-२ अद्ययावत करता येईल. आवश्यक असल्यास शाखा, माध्यम, पसंतीक्रम यामध्ये आपणास बदल करता येईल. प्रत्येक फेरीत सहभागी होण्यासाठी भाग-२ अर्ज लॉक केला असल्याची खात्री करा.

९) अलॉटमेंट मिळाल्यानंतर, दिलेल्या वेळेतच आवश्यक कागदपत्रांसह प्रवेशासाठी जा. आपले अलॉटमेंट लेटर तपासा. त्यामध्ये विद्यालयाची प्रवेशाची कार्यपद्धती जाणून घ्या.

१०) मिळालेल्या उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये प्रवेश घ्यावयाचा असल्यास विद्यार्थी लॉगीनमध्ये 'PROCEED FOR ADMISSION' करा व मग प्रवेशासाठी जा. जर प्रवेश घ्यावयाचा नसेल, तर प्रकरण ६ मधील सूचना वाचा व त्यानुसार योग्य निर्णय घ्या.

११) आपल्या पाल्याच्या इ.११वी प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे अगोदरच (जसे शाळा सोडल्याचा दाखला, जातीचे प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला/उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र इत्यादी) काढून ठेवा. ऐनवेळेची धावपळ व निराशा टाळा.

१२) आपल्या पाल्यास योग्य ठिकाणी व सुलभतेने प्रवेश मिळवून देण्यासाठीच ही प्रक्रिया राबवित आहोत. प्रत्येक विद्यार्थ्यास प्रवेश मिळेल याची खात्री बाळगा आणि सहकार्य करा.

१३) अर्ज भरताना योग्य व अचूक मोबाईल नंबर द्या. त्यावर प्रवेशाबाबत SMS येतील.

डीटीपी आणि आतील सजावट : समृद्धी-९७३०१०६७५५

# 8 Other allied aspects

## A) For Parents :

1) Counsel your ward instead of pressuring and help him/her to choose a proper career path.

2) No one else other than you knows better about the abilities and guts of your ward. Be his/her friend and help him/her take apt decision.

3) You should also understand the admission process and take a correct decision on time. You can take assistance from helpline or nearby Guidance Centre on call.

4) Frequently visit the admission portal to know the instructions given from time to time.

5) The information booklet of online admission is made available on the portal. Do fill your form through portal preferably at your home, pay processing fee online and reverify the into given in the form by rechecking yourself.

6) If you are unable to get and will also be unable to get any certificate, submission of application form through General Category is open to all.

7) You can seek help from any school or guidance center.

8) Part-2 of admission form can be updated before every admission round. If necessary you can change stream, medium, preference order there. Do confirm if option form Part-2 if locked before every round.

9) After declaration of allotment List, contact to the allotted Junior College for admission and visit with necessary documents within stipulated time. But before visiting the Jr. College do check their procedure for admission in your allotment letter.

10) If you want to confirm admission in allotted Jr. College, please go to the student login and click on 'PROCEED FOR ADMISSION'. After this only visit the concerned Jr. College for admission. If you are not willing to take admission there please refer the instructions given in Chapter-6 and take appropriate decision.

11) Keep all the required documents for admission ready (Like Leaving Certificate, Caste Certificate, Income Certificate, Non creamy Layer Certificate, etc.) well in advance.

12) This process is for easy and appropriate admission of your ward, keep faith and do co-operate to the system.

13) Give a proper and correct Mobile Number while filling admission form. SMS will be sent on this number.

## ब) प्रवेश देणाऱ्या उच्च माध्यमिक विद्यालयांनी करावयाची कार्यवाही :

१) कागदपत्र पडताळणी, मार्गदर्शन व प्रवेश देणे यासाठी स्वतंत्र व्यवस्था तयार ठेवा. पात्र लाभार्थी प्रवेशापासून वंचित राहणार नाहीत व अपात्र प्रवेशित होणार नाहीत याची दक्षता घ्या.

२) फेरीनंतर प्राप्त निवड यादीतील विद्यार्थ्यांना सुलभतेने प्रवेश घेता यावेत यासाठी प्रवेश देण्यासाठी पूर्णवेळ यंत्रणा/व्यवस्था करणे. विद्यार्थ्यांनी केलेले फोन, ई-मेल तपासून त्यांना उत्तरे देणे.

३) प्रवेशाच्या वेळी गर्दी होऊ नये यासाठी पुरेशी यंत्रणा उपलब्ध करावी तसेच आवश्यक सूचनाफलक लावावेत.

४) प्रत्येक विद्यार्थ्यास प्रवेशाबाबतची बहुतांश कार्यवाही ऑनलाईन अथवा एकाच ठिकाणी पूर्ण करता येईल असे पाहावे.

५) विद्यार्थ्याने अपलोड केलेल्या व मूळ कागदपत्रांची तपासणी करून ऑनलाईन प्रवेश निश्चित करा व सर्व मूळ कागदपत्रे प्रत्यक्ष प्रवेशावेळी तपासा व प्रवेश अंतिम करा. आरक्षित प्रवर्गातून आलेले विद्यार्थी त्या आरक्षणास अपात्र ठरत असल्याचे आपल्या निदर्शनास आल्यास तशी नोंद घेऊन त्यास प्रवेश नाकारता येईल तशी स्पष्ट नोंद वेब पोर्टलवर करावी.

६) विद्यार्थ्याने ऑनलाइन प्रवेश अर्जातील मजकूर व प्रत्यक्षात प्रवेशाच्या वेळी सादर केलेली कागदपत्रे व माहितीमध्ये तफावत आढळल्यास त्यास विशेष फेरीपर्यंत प्रवेश प्रक्रियेपासून वंचित ठेवण्यात येईल. परंतु सर्वांसाठी खुल्या विशेष फेरीमध्ये प्रवेश घेण्यास संबंधित विद्यार्थी पात्र असेल. तथापि इयत्ता दहावीच्या गुणपत्रकामध्ये फेरफार असल्यास पुढील कोणत्याही फेरीसाठी विद्यार्थी पात्र असणार नाही.

७) प्रवेशाबाबतची नोंद त्याच दिवशी (दिलेल्या वेळेत) वेब पोर्टलवर होईल याची दक्षता घ्यावी.

८) प्रवेश रद्द करणाऱ्या विद्यार्थ्यास प्रवेश रद्द करण्याचे कारण विचारून त्याची नोंद वेब पोर्टलवर स्पष्टपणे करावी. प्रवेश रद्द केल्यानंतर पुन्हा पसंतीचे उच्च माध्यमिक विद्यालय मिळेलच याची शाश्वती नाही, अशी जाणीव विद्यालयांनी विद्यार्थ्यांना करून द्यावी.

९) द्विलक्षी विषयांचे प्रवेश- प्रवेशित विद्यार्थ्यांना द्विलक्षी विषयांचे वाटप गुणवत्तेनुसार व लागू असलेल्या आरक्षण पद्धतीने उच्च माध्यमिक विद्यालय स्तरावरून करावयाचे आहे.

१०) कोटा प्रवेशांतर्गत जागा यथाशीघ्र भराव्यात अथवा त्या जागा प्रत्यार्पित करण्याचा निर्णय लवकरात लवकर घ्यावा. शेवटच्या फेऱ्यांमध्ये अशा जागा प्रत्यार्पित झाल्यास त्यास पुरेसे विद्यार्थी उपलब्ध असतील याची शाश्वती नसेल. कोटा प्रवेशाच्या सुधारित नियमानुसार नियमित फेरी-२, ३ पर्यंत कोटा प्रवेश पूर्ण करा.

११) प्रत्येक फेरीनंतर (कोट्यासह) भरलेल्या जागा व प्रवेशासाठी रिक्त जागांचा तपशील सुलभतेसाठी विद्यालयाच्या दर्शनी भागात लावावा, तसेच वेब पोर्टलवर अपडेट करावा. त्यासाठी या पुस्तिकेतील प्रवाहतक्ते / Flow chart व सूचना अभ्यासा.

## B) For Junior Colleges (The admitting authority) :

1) Prepare separate arrangements for document verification, guidence and admission. Ensure that eligible students are not deprived of admission and ineligible students are not admitted.

2) Establish a full time set up and system to facilitate the students for easy admission, after the declaration of admission list. Do reply to calls and e-mails of students.

3) Display necessary instructions on the Notice Board and deploy enough staff to the admission work, to avoid over crowding. Try not to convene students to the college. Contact the students, get them admitted online and make careful verification of documents before admission.

4) Ensure that, students can complete the most of admission process at a single window or online.

5) Jr. College should consider uploaded document with originals and fix the students' admission online. Verify all original documetns at the time of actual addmission. If any student claiming reservation found not eligible for it, the Jr. College should record it and reject the admission, it should be updated on the portal accordingly.

6) If a student finds any discrepancy between the information and documents submitted by him/her in the online admission form and the information submitted at the time of admission, he/she will be disqualified from the admission process till the special round, but the student will only be eligible for admission in the special open to all round. However, if there is any change in the grade 10 mark sheet, the student will not be eligible for any subsequent round.

7) Jr. College should ensure the updation of each admission on the portal immediately preferably on the same day in provided time .

8) Do mention reason for the cancellation of admission (if any) on the portal in short but in meaningful words. Jr. College needs to make them aware of that, students please note that after cancellation of admission there is no guarantee of getting a better Jr. College of your choice.

9) Admissions to Bifocal subjects are to be done at Jr. College level on the basis of merit and due reservations.

10) Ensure the filling of all Quota seats ahead of time or take the decision of surrendering these vacant seats as early as possible. There will be no guarantee of the enough number of students available against the surrendered seats at later rounds. Kindly observe the revised quota admission rules and try to colplete quota admissions by round-2 or 3 accordingly.

11) Display the actual data of filled seats and vacant seats after every round (including quota admissions) at the entrance of Jr. College for convenience. And update it on the portal too. Refer and study the flow charts given in this booklet.

१२) आपल्या उच्च माध्यमिक विद्यालयातील ७५ टक्के प्रवेश पूर्ण झाल्यानंतर इ.११वीचे वर्ग सुरू करण्याचे स्वातंत्र्य संबंधित उच्च माध्यमिक विद्यालयांना असेल. दि. ११ ऑगस्ट २०२५ रोजी सुरू करणे आवश्यक असेल. यापैकी प्रथम जे घडेल ते करणे शाळा व्यवस्थापनास आवश्यक असेल.

१३) संपूर्ण प्रवेश प्रक्रिया कमीत कमी वेळेत पूर्ण करता यावी यासाठी सर्वांचे सक्रिय सहकार्य आवश्यक आहे.

१४) सैनिकी उच्च माध्यमिक विद्यालये, रात्र उच्च माध्यमिक विद्यालये व दिव्यांगांसाठीची विशेष उच्च माध्यमिक विद्यालये वगळता इतर सर्व प्रकारच्या उच्च माध्यमिक विद्यालयांना या प्रवेश प्रक्रियेत सहभागी होणे बंधनकारक आहे.

१५) एचएसव्हीसी अर्थात व्यावसायिक अभ्यासक्रम शाखेचे प्रवेश उच्च माध्यमिक विद्यालय स्तरावरून करावयाचे आहेत. या प्रवेश प्रक्रियेद्वारे केवळ कला, वाणिज्य व विज्ञान शाखांसाठी प्रवेश होतील.

12) The respective Jr. College will have the freedom to begin classes for std. 11 after seventy-five percent of their admissions. It will be necessary to open 11the classes on 11th August 2025. It will be necessary for the school management to do so whichever happens first.

13) The active co-operation of everybody is anticipated for the prompt and smooth functioning of this admission process.

14) It is compulsory for all Junior Colleges to participate in this online admission process except Military Junior Colleges, Night Jr. Colleges and special Junior Colleges for Disabled students.

15) Admissions to HSVC that is HSC-vocational stream are to be done at Jr. College level. This online admission process is limited to Arts, Commerce and Science streams only.

डीटीप आणि आतील सजावट : समृद्धी-९७३०९०६७५५

## क) मार्गदर्शन केंद्रांची / माध्यमिक शाळांची भूमिका :

१) विद्यार्थ्यास माहितीपुस्तिका प्रत पाहण्यासाठी उपलब्ध करून देणे.

२) विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज भरण्यास सर्व प्रकारे मदत करणे व भरलेला अर्ज (भाग-१) तपासून योग्य असल्याची खात्री करणे, मार्गदर्शन करणे.

३) विद्यार्थ्यास आवश्यक कागदपत्रांबाबत मार्गदर्शन करणे व ती अपलोड करण्याबाबत मदत करणे.

४) अर्जाच्या भाग-२ मध्ये गुण नोंदी तसेच, आवश्यकतेप्रमाणे वेळोवेळी पसंतीक्रम नोंदविण्यास विद्यार्थ्यांना सहाय्य करणे.

५) बाहेरून येणाऱ्या विद्यार्थ्यांना, तसेच अन्य मंडळाच्या विद्यार्थ्यांना अर्ज भरणे, प्रमाणित करणे, माहिती अद्ययावत करणे, इत्यादीसाठी संपूर्ण सहाय्य करणे.

६) विद्यार्थ्यांच्या विनंतीनुसार विद्यार्थी लॉगीनचा पासवर्ड विद्यार्थ्यास रिसेट करून देणे. अर्जातील माहितीमध्ये आवश्यक दुरुस्त्या करून देणे.

७) ज्या अन्य मंडळाच्या गुणपत्रिका श्रेणी स्वरूपात आहेत अथवा त्यांचे गुणांमध्ये रूपांतर करणे आवश्यक आहे (उदा.- ICSE/IGCSE) अशा विद्यार्थ्यांना गुणांचे रूपांतर करण्यासाठी सहाय्य करावे.

८) विद्यार्थी त्यांचे गुण स्वतः रूपांतरित करून नोंदविणार आहेत. त्याची गुणपत्रकावरून काळजीपूर्वक तपासणी करावी व गुणपत्रकावर दिलेल्या निकषानुसार नोंदवलेले गुण योग्य असल्याची खात्री करावी.

९) अन्य मंडळाच्या माध्यमिक शाळांनी आपल्या विद्यार्थ्यांना मिळालेल्या गुणांकांचे/श्रेणींचे रूपांतर करण्यास मदत करावी, विषयनिहाय गुणपत्रके प्रमाणित करून द्यावीत.

१०) ज्या शिक्षण मंडळाचे निकाल ऑनलाईन जाहीर झाले आहेत व विद्यार्थ्यांना गुणपत्रके मिळालेले नाहीत असे विद्यार्थी डिजी लॉकरद्वारे मिळालेली प्रत किंवा शाळेने प्रमाणित केलेली ऑनलाईन प्रत सादर करतील. असे गुणपत्रक तात्पुरते ग्राह्य असेल. (मूळ प्रमाणपत्र सादर करण्याच्या अटीवर)

११) अर्ज भरताना विद्यार्थ्याने अर्जामध्ये भरलेली सर्व माहिती, त्याचे इ.१०वीचे गुण व अपलोड केलेली कागदपत्रे यांची पडताळणी करणे.

१२) प्रत्येक माध्यमिक शाळेने आपल्या इ.१०वीच्या विद्यार्थ्यांनी सदर प्रवेश प्रक्रियेद्वारे इ.११वीसाठी अर्ज भरला आहे किंवा कसे याची खात्री करावी. आणि आपल्या विद्यार्थ्यांचे अर्ज शाळेतूनच भरले जातील अशी व्यवस्था करावी.

१३) आपल्याकडील सर्व अर्ज तपासून घ्या. वेळेत प्रमाणित करून द्या. गरज असल्यास विद्यार्थ्यांशी फोनवरून संपर्क साधा.

१४) शिक्षण उपसंचालक कार्यालयाने/शिक्षणाधिकारी यांनी वेळोवेळी सोपविलेल्या जबाबदाऱ्या पार पाडणे, झालेल्या खर्चाचा हिशेब सादर करणे.

१५) विद्यार्थ्यांना मार्गदर्शनासाठी सर्वसाधारण वेळ सकाळी १० ते सायंकाळी ६ पर्यंत राहील. तथापि, विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी आपले मार्गदर्शन केंद्र सुरू असण्याची वेळ बाहेर दर्शनी भागात लावावी.

डीटीपी आणि आतील सजावट : समृद्धी-९७३०१०६७५५

## C) Role of Guidance Centres / Secondary Schools :

1) Make some copies of information booklet to students for viewing purpose.
2) Help the students all the way to fill the online admission form and approve the filled information in it.
3) Guide the students about required documents and assist them to upload it on the portal.
4) Assist students in filling preferences from time to time and help check the entered marks in Part-2.
5) Assist students coming from outside or students of other boards in filling form, verification and update information etc. Help making corrections wherever necessary.
6) As per the request of students reset their student login password. Make requested corrections in the form.
7) The students of other boards (like- ICSE/IGCSE) having mark sheet in the form of grade or requires conversion. Do assist those students if required.
8) Students will convert and enter their mark themselves. Do check the uploaded mark sheet and verify the entered total marks as per the criteria mentioned on that mark statement.
9) Other Boards' Secondary Schools may issue a grade to marks conversion certificate. Otherwise help students regarding that.
10) Students whose Board result have been announced online and students have not recieved physical marks statement will submit a copy obtained through DigiLocker or an online copy certified by the school. Such provisional marksheet can be accepted for verification purpose only. (Expecting originals)
11) Kindly check and verify all the information filled by the student in the application form, manually entered marks and uploaded documents.
12) Every Secondary School should confirm if their 10th passed students have applied through this online system for 11th admission and do alow or your students fill their forms form the school itself.
13) Check all application forms at your end and get them verified ASAP. If required you can speak to the applicant over the telephone.
14) Complete and carryon various responsibilities given by the office of the Deputy Director of Education/District Education officer. Submit account of expenditure to them.
15) Normally Guidance centres should be available from 10 AM to 6 PM for assistance. However for student's convinience kindly display the working hours of your Guidance centre at the entrance.

धन्यवाद!



डीटीप आणि आतील सजावट : समृद्धी-९७३०१०६७५५

**MINORITY COMMUNITY STUDENT'S**

**SELF DECLARATION**

**For Admission under Minority Quota**

**Std.11th Centralised Online Admission Process**

Application Form No: - ............................................................ City :- ..................................................

I, ............................................................................................................................................ (Student's Name) hereby declare that

As my mother tongue is not mentioned in my Leaving/Transfer Certificate for deciding my candidature under linguistic minority status. I undertake that my mother tongue is ...................................... . so

I belong to **LINGUISTIC MINORITY** community.

***(Bengali/Gujarati/Hindi/Konkani/Marwadi/Odiya/Punjabi/Sindhi/Kannada/Malayalam/Tamil/Telugu/Urdu/South Indian,Gujar/Bhilli/Lamani/etc.)***

**AND / OR**

As my religion is not mentioned in my Leaving/Transfer Certificate for deciding my candidature under religious minority status. I undertake that my religious community is ...................................... . so

I belong to the **RELIGIOUS MINORITY** community.

***Buddhist /Christian /Jain /Muslim /Zoroastrian(Parsi) /Sikh**

I undertake to submit the relevant documents supporting my claim for belonging to minority community as per government resolution Minority Department No.AVV-2010C.No109/10Desk-5,Dated.01/07/2013 at the time admission

*( *Strike out whichever is not applicable)*

**Date- / /20**

-------------------------------------------------- | --------------------------------------------------

**Student's Signature and Name** | **Parent's Signature and Name**

------------------------------------------------------------------ | ------------------------------------------------------------------

*(प्रवेश प्रक्रियेसाठी आवश्यक कागदपत्रे अर्ज भरतेवेळी सादर करु न शकल्यास विद्यार्थ्याने द्यावयाचे)*

## हमीपत्र

प्रवेश अर्ज क्र.:-

विद्यार्थ्याचे नाव:- ------------------------------------------------

*मूळ जात प्रवर्ग :- ------------------------------ अर्ज केलेला जात प्रवर्ग :- ------------------------

*अन्य आरक्षणाचा लाभ घेणार असल्यास प्रकार :- ------------------------------------------------

*स्वत: अल्पसंख्याक असल्यास (धार्मिक/भाषिक) प्रकार व तपशील :- ------------------------------

मी, खाली स्वाक्षरी करणार अर्जदार विद्यार्थी ------------------------ (शहर) या ऑनलाईन प्रवेश क्षेत्रामध्ये इ.11वी मध्ये प्रवेश घेण्यासाठी ऑनलाईन अर्ज केलेला आहे. मला आरक्षणाचा लाभ मिळावा म्हणून माझेकडे उपलब्ध असलेली सर्व कागदपत्रे मी सादर/अपलोड केलेली आहेत आणि उर्वरित आवश्यक प्रमाणपत्रे मूळ प्रतीसह प्रवेशाचे वेळी सादर करीन. माझे कागदपत्रे सादर/अपलोड बाबत स्थिती खालीलप्रमाणे आहे. **(√ याचा अर्थ होय, X याचा अर्थ नाही असा आहे. NA= लागू नाही)**

| | दाखला / प्रमाणपत्र | अर्जासोबत सादर केले (√ किंवा X अशी खूण करा) | प्रवेशावेळी सादर करणार (√ किंवा X अशी खूण करा) | शेरा |
|---|---|---|---|---|
| 1 | इ.10वी शाळा सोडल्याचा दाखला | | | |
| 2 | इ.10वी गुणपत्रक | | | |
| 3 | जातीचा दाखला/प्रमाणपत्र | | | स्वत:चे |
| | जातीचा दाखला/प्रमाणपत्र | | *** | वडीलांचे |
| 4 | उन्नत व प्रगत गटात मोडत नसलेबाबतचे NCL प्रमाणपत्र | | | कुटुंबाचे |
| 5 | अन्य आरक्षणाबाबत प्रमाणपत्र | | *** | स्वत:चे |
| 6 | स्वयंघोषणापत्र (अल्पसंख्याक) | | *** | NA |
| | | | | |

याद्वारे मी असे जाहीर करतो/ते की, मी माझे प्रवेश अर्जामध्ये नमूद केलेली सर्व माहिती माझ्या समजुतीनुसार खरी व अचूक दिलेली आहे.

मी असे हमीपत्र देतो/ते की, माझ्या प्रवेशासाठी आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे (मूळ प्रती) मी वेळेत / प्रवेशावेळी संबंधित विद्यालयास सादर करीन. आणि, जर मी सदर प्रमाणपत्रे वेळेत सादर केली नाहीत अथवा मी प्रवेश अर्जामध्ये दिलेली माहिती व माझी मूळ कागदपत्रे यामध्ये तफावत आढळल्यास मला प्रवेश दिला जाणार नाही किंवा माझा प्रवेश रद्द होईल याची मला जाणीव आहे.

**दिनांक- / /20**

------------------------------ ------------------------------

**विद्यार्थ्याचे नाव व स्वाक्षरी** **पालकांचे नाव व स्वाक्षरी**

------------------------------ ------------------------------

(सदर घोषणापत्र स्वत: स्वाक्षरी करुन संकेतस्थळावर अपलोड करावे तसेच पडताळणीसाठी सादर करावे.)

## Std.11th Centralised Online Admission Process

*(This is for those students who are unable to upload certain documents at the time of form filling)* **Undertaking**

Application Form No: -

Name of Student: - ____________________

*Original Category: - ____________ *Form filled Category: - ____________

*If claimed any other reservation, mention TYPE: - ____________________

*If under minority (Religious/Linguistic) mention Details: - ____________________

I, (under signed) being an Applicant Student have submitted an Application Form, for 11th admission at ____________ (City). To avail the benefits under the reservation, I have Submitted/uploaded all the documents which were available with me and I will submit rest of documents with originals at the time of admission. My document submission status is as under.

(√ mark shows YES, X mark shows NO, NA=Not Applicable)

| | Certificate / Document | Uploaded NOW (make √ or X mark) | Will submit LATER (make √ or X mark) | Remark |
|---|---|---|---|---|
| 1 | Std.10th School L.C. | | | |
| 2 | Std.10th Mark sheet | | | |
| 3 | Caste Certificate | | | Self |
| | Caste Certificate | | *** | Father's |
| 4 | Non-Creamy Layer i.e. NCL Certificate | | | Family's |
| 5 | Other Reservation Doc's | | *** | Self |
| 6 | Self-Declaration (Minority) | | *** | NA |
| | | | | |

I, hereby, declare that, the entries made by me in the Application Form are complete and true to the best of my knowledge and based on records.

I, hereby, undertake to present all the required original documents in time, may be at the time of admission to the concerned Jr. College. And I am aware that, if I fail to do so i.e. if I do not submit these documents in time or if there will be any discrepancy between the information I have given in the application form and my original certificates, my admission will remain cancelled or be denied.

**Date- / /20**

**Student's Signature and Name** **Parent's Signature and Name**

(Kindly upload this Undertaking on the website duly self-signed produce for verification)

डीटीप आणि आतील सजावट : समृद्धी-९७३०१०६७५५

## इ.11वी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया

*(प्रवेश प्रक्रिया पोर्टलवर नोंदणीसाठी कनिष्ठ महाविद्यालयांनी द्यावयाचे)*

## स्वयं घोषणापत्र

कमविचे नाव :- ----------------------------------------------------------------------------------------------------------------

युडाईस क्र. :- ------------------------------------------------ सांकेतांक :- ------------------------------------------

मी, खाली स्वाक्षरी करणार असे जाहीर करतो/ते की, आम्ही -------------------------------- (शहर) या ऑनलाईन प्रवेश क्षेत्रामध्ये इ.11वी मध्ये प्रवेश प्रक्रियेसाठी कनिष्ठ महाविद्यालयाची ऑनलाईन नोंदणी केलेली आहे. सदर कामी आमचे कनिष्ठ महाविद्यालयाबाबत तपशील पुढीलप्रमाणे आहे.

! कमवि परवानगी /सुरु वर्ष :- ---------------------

! कमवि संलग्न स्तर :- **माध्यमिक संलग्न /स्वतंत्र कमवि /महाविद्यालय संलग्न.**

**!** कमवि साठी उपलब्ध वर्गखोल्या :- ------------------ एका वर्गखोलीची बैठक क्षमता:- ------------------

| | **शाखा** | **माध्यम** | **तुकड्या** | ***अनुदान प्रकार** | **स्ट्रीम कोड** | **द्विलक्षी व IT विषय** |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | कला | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| 2 | वाणिज्य | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| 3 | विज्ञान | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| 4 | संयुक्त | | | | | |
| | | | | | | |

! शेरा- ------------------------------------------------------------------------------------------------------------------------

याद्वारे असे जाहीर करण्यात येते की, ऑनलाईन शाळा नोंदणी अर्जामध्ये नमूद केलेली सर्व माहिती माझ्या समजुतीनुसार खरी व अचूक आहे. मी असे हमीपत्र देतो/ते की, नोंदणी अर्जामध्ये दिलेली माहिती व मूळ कागदपत्रे यामध्ये तफावत आढळल्यास शासनास चुकीची माहिती दिली असे गृहित धरुन पुढील कारवाई होऊ शकते याची मला जाणीव आहे.

**दिनांक- / /20**

---------------------------------------------- ----------------------------------------------

**संस्था प्रतिनिधी नाव व स्वाक्षरी** **प्राचार्य नाव व स्वाक्षरी**

------------------------------------------------------------ ------------------------------------------------------------

(सदर स्वयं घोषणापत्र स्वत: स्वाक्षरी करुन संकेतस्थळावर अपलोड करावे व पडताळणीसाठी सादर करावे.)

* Aided/ UnAided/ Self Financed

डीटीपी आणि आतील सजावट : समृद्धी-९७३०९०६७५५

# NOTES







डीटीप आणि आतील सजावट : समृद्धी-९७३०९०६७५५